# अरण्यगूज



प्र. सु. हिरुरकर

या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!

# अरण्यगूज

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

### पण तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# अरण्यगूज

लेखक

**प्र. सु. हिरुरकर**

# अरण्यगूज

## लेखक... प्र.सु.हिरुरकर

‘ रानभूल ’ , जवाहर नगर, लेन नं. 4,
नवसारी बस स्टॉप जवळ, पो. वि.म.वि., अमरावती – 444 604
भ्रमणध्वनी – 9822639798 / 8329764007
ranbhul@gmail.com

मुखपृष्ठ व सर्व छायाचित्रे –प्र.सु.हिरुरकर

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

Whatsapp- 9987737237
www.esahity.com
esahity@gmail.com

eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane. 400604
**प्रकाशन : १२ मार्च २०२२**



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अरण्यगूज

लेखक – प्र.सु.हिरुरकर,

- परिचय पत्र -

नांव : **प्रदीप सुखदेवराव हिरुरकर**,वन्यजीव लेखक

जन्मतारीख: 17 मार्च , 1962

पत्ता :'रानभूल' , लेन क्र.4,जवाहर नगर, अमरावती-444 604

दूरध्वनी : 2531102 भ्र.ध्व. 9822639798.

नोकरी : सेवानिवृत्त स्वीय सहाय्यक, विभागीय माहिती कार्यालय, अमरावती. दूरध्वनी : 2551499

छंद : जवळपास 30 वर्षापासून अरण्य भटकंती करुन वन्यजीवांचे निरीक्षण व त्यावर आधारित अरण्य लेख दै.महाराष्ट्र टाईम्स, दै.लोकसत्ता, साप्ता.लोकप्रभा, दै.लोकमत, दै.तरुणभारत, दै.हिंदुस्थान,दै.सकाळ, दै.जनमाध्यम इ.वृत्तपत्रात प्रकाशित होत असतात.



**प्रकाशित पुस्तके** : *वन, वन्यजीवन आणि पर्यावरणावर आधारित*

1. **अरण्य ओढ** (जून, 2005 मध्ये प्रकाशित.)
2. **भुलनवेल** (22 सप्टेंबर, 2007 रोजी प्रकाशित.)
3. **पक्षिमेळा** (5जून,2009 पर्यावरणदिनी प्रकाशित.)
4. **बांधवगडचा शिकारी**
5. **रानवेड**
6. **पडाव** : रानावनातील ब्रिटीशकालीन विश्रामगृहे
7. **A Legacy of British** :Rest Houses in Forests
8. **अरण्यलिपी**

**व्हिडीओ लघुपट** :

1. **टिटवी** (मराठी), Red wattled lapwing(English)
2. **Natures Blessing**
3. **पोपटाचं एक गांव**

**संशोधन कार्य** : सातपुडा पर्वतराजीत ताप्तीच्या खोऱ्यात अश्मयुगीन चित्रगुहांचा (15 ते 20 हजार वर्षापूर्वीच्या ) Hopeच्या चमूसोबत शोध. जानेवारी, 2007मध्ये प्रथम शोध.आतापर्यंत अशा ३० चित्रगुहांचा शोध.रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियाच्या पुराकला -2007 च्या जरनलमध्ये शोध प्रबंध प्रसिध्द. केरळमधील सुलतान बथेरी येथे 2007मध्ये, भोपाळ येथे रॉक आर्ट सोसायटी ऑफ इंडियातर्फे ,बदामी (कर्नाटक) येथे आयोजित आंतर राष्ट्रीय परिषदेस उपस्थित. (RASI , ASI), "भुलनवेल" या रहस्यमय वेलीचा मेळघाटात 2009 मध्ये शोध.

**पुरस्कार** : 1993-94 चा राज्य शासनाच्या विकास वार्ता पुरस्कार

जुलै, 2006 मध्ये मा.मुख्यमंत्री यांचे हस्ते विशेष कामगिरीबाबत गौरव,प्रशस्ती पत्र व सत्कार.

**कार्य** : वन, वन्यजीवन आणि पर्यावरण या विषयांवर शाळा, महाविद्यालयांमध्ये व्याख्यान.पर्यावरण रक्षणासाठी काम करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन. जगप्रसिध्द चित्रगुहा असलेल्या भिमबेटका(मध्य प्रदेश) येथे ऑक्टोंबर 2008मध्ये भेट.(चमूसह)

**भ्रमंती** : सायलेंन्ट व्हॅली, कान्हा, बांधवगड, पेंच, मेळघाट, पैनगंगा अभयारण्य, वायनाड अभयारण्य (केरळ)

# **अर्पण पत्र**

माझ्या मते प्रत्येक मानवास दोन आई असतात.

पहिली जन्मदाती तर दुसरी पृथ्वी.

जन्मदाती आई आपल्याला जन्म देते, पालन पोषण करते आणि आपल्यावर योग्य ते संस्कार करते. तर पृथ्वी आई मानवासहित इतर सर्व सजीवांना पाणी, हवा, फळं, धान्य, सूर्यप्रकाश इ. देते. एवढंच नव्हे तर शेवटी ती आपल्या कुशीत सामावूनही घेते.

**या दोन्ही आईवर मनापासून प्रेम करणाऱ्या सर्व निसर्गसख्यांना रानवाटा हे पुस्तक अर्पण.**

**- प्र.सु.हिरुरकर**

# लेखकाचे मनोगत

‘रानवाटा’ हे माझे तीन तपाच्या अरण्य भटकंतीतील निरीक्षणावर प्रकाशित होणारे नउवे पुस्तक. परंतु हे माझे पहिले ई बुक आहे.. आधूनिक आणि गतीमान जगाबरोबर आपणही बदलले पाहिजे आणि जगभरातील वाचकांना ते वाचायला मिळाले पाहिजे यासाठी हा प्रयत्न. यापूर्वी वन, वन्यजीवन, पशुपक्षी यावर आधारित माझे अरण्यओढ, पक्षिमेळा, भुलनवेल, बांधवगडचा शिकारी, रानवेड, पडाव : रानावनातील ब्रिटीशकालीन विश्रामगृहे, पडावचे मराठी भाषांतर A Legacy of the British : Rest Houses in Forest, आणि अरण्यलिपी अशी आठ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.



रानवाटा या पुस्तकात एकूण 25 प्रकरणे असून ती सर्व दै. महाराष्ट टाइम्स, दै. लोकसत्ता, दै. तरुण भारत इ. वृत्तपत्रात वेळोवेळी प्रसिध्द झाली आहेत. अरण्य भटकंती सोबत माझा वन्यजीव छायाचित्रणाचा छंदही आता हळूहळू वाढू लागला आहे. रानवाटा पुस्तकातील सर्व छायाचित्रे ही माझ्या कॅमेरातून क्लीक झालेली आहेत.

रानवाटा हे पुस्तक कोणत्या प्रकाशकाकडे दृयावे या विचारात असतांना मुंबई येथील प्रसिध्द साहित्यिक व माझे मित्र आदरणिय श्री प्रल्हाद जाधव साहेब यांचेशी दुरध्वनीवरुन चर्चा झाली. त्यातून इ बुक काढण्यासाठी त्यांनी योग्य ते मोलाचे मार्गदर्शन केले आणि मुंबई येथील ई साहित्य प्रतिष्ठानचे श्री सुनीळ सामंत यांचा संपर्क ध्वनी दिला. त्यांचेशी मी स्वत: चर्चा केल्यानंतर रानवाटा हे ई बुक स्वरुपातच काढण्याचे ठरले. कारण अख्या जगभर जवळच्या मोबाईलवर डाऊनलोड करुन असंख्य वाचक ते वाचू शकतात. या दोघांचाही मी ऋणी आहे.

या पुस्तकासाठी मला ज्या ज्ञात अज्ञात व्यक्तींचे, शक्तींचे सहकार्य मिळाले त्या सर्वांचा मी मनापासून आभारी आहे.

- प्र.सु. हिरुरकर, अमरावती.

- अनुक्रमणिका -

1. अरण्यरंग
2. तळ्यावरील शिकारनाट्य
3. व्याघ्रभूमी
4. रानवाटा
5. भुलनवेल
6. सोयरे वनचरे
7. जंगलाचं देणं
8. व्याघ्र संवर्धन की व्याघ्र पर्यटन ?
9. मानव-वन्यजीव संघर्ष
10. मेळघाट भटकंती
11. मेळघाटी होळीरंग




रोही(नर) आणि राजहंस

शिशिर ऋतु असल्याने शुष्क पर्नगळीच्या झाडांची पानगळ सुरु होती. गवती वनस्पतीला बिया पकडून ती तांबडी-पिवळी पडली होती. गवताच्या ठोंबावरील बियांवर मूनिया, चंडोल इ. पाखरांचे थवेच्या थवे तुटून पडतांना दिसत होते. शेंदऱ्या फुलांनी नखशिखान्त डवरलेलं पळसाचं झाड पळस मैनेच्या चिक् चिक् आवाजाने बोलू लागलं होतं. विशेष बाब म्हणजे एका पळसावर एक मैना जरी असली तरी कित्येक मैना असल्यासारखे त्या आवाजामुळे वाटत होतं. पळसा बरोबर या काळात रानावनाचं सौंदर्य फुलवणारं दुसरं झाड महत्वाचं झाड म्हणजे गुलाबी फुलांचं शाल्मली. या दोन झाडांमुळे रानावनाचं उन्हाळी सौंदर्य मनमोहित करत होतं. निसर्गात रंग आणि सौंदर्याची प्रथम सुरुवात वनस्पती आणि झाडं त्यांच्या फुलांपासूनच झाली असावी. फुलांचा आणि पाखरांचा हा आनंदोत्सव पहाटे पहाटे चैतन्यदायी वाटत होता. जणूकाही येणाऱ्या वसंत ऋतूच्या स्वागाताचाच हा सोहळा असावा. काही वेळातच अमरावती-नागपूर महामार्गावरुन सावर्डी गावातून जळका शहापूर जलाशयाकडे कच्च्या रस्त्याने निघालो. जलाशयाच्या अलीकडे उजव्या गवती माळरानात दूरवर काही हालचाल दिसली. एक हरिणी आपल्या पाडसाच्या सुरक्षिततेसाठी जीवाचा आटापिटा करत होती. जवळपास फर्लांगभर अंतरावरुन तीचे लक्ष आमचेकडे गेले. काहीवेळ तीने परिस्थितीचा अंदाज घेतला आणि पाडसासह दूरवर निघून गेली. आम्हीही पुढ्यातील जलाशयावर पोहचलो.

जलाशय अर्धवट कोरडे पडले असून त्यावर हिरव्यागच्च गवती वनस्पतीची सुरेख चार अंथरु लागली होती. पाण्यातील एका लहानशा बेटावर दोन मोठे पाणकावळे समाधिस्त बसले होते. नावाने पाणकावळा (Great Cormmorant) जरी असला तरी काळ्या रंगाच्या या पक्ष्याच्या नराच्या डोक्यावरुन मानेपर्यंत सुंदरसा पांढरा रंग त्यात बरोबर डोळ्याखाली चोचीवर इवलासा पिवळा-तांबडा ठिपका अधिकच शोभून दिसतो



मोठा पाणकावळा

तसेच त्याच्या पायाच्या गुडघ्याजवळ शुभ्र पिंजालेल्या कापसासारखा उभा पट्टा आणि काळ्या पंखावर बारीक खवल्यासारखी हलकीसी सुरेख नक्षी लक्ष वेधून घेत होती. तलावावार चार मोठमोठ्या पंखाचे जांभळा कोहकाळ पक्षी पाण्यावरुन ऑक् ऑक् आवाज करत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे एकसारखे उडत जलाशयावरची शांतता भंग करत होते. चार काळे कंकर, धनचुआ, आणि टिटवी पक्ष्यांशिवाय जलाशय तसे शांत शांत वाटत होते.

येथे पोहचून केवळ दहा मिनिटे झाले असतील तोच तलावाच्या पूर्वेकडून पांढऱ्या-मातकट रंगाच्या शेकडो पक्ष्यांचा एक थवा ऑग् ऑग आवाज करत येतांना दिसला. क्षणाक्षणाला या आवाजाचं एकच वादळ पाण्यावर उठू लागलं होतं. काही वेळातच हा थवा पाण्यावरुन आमच्या पुढ्यातून तलावाच्या पश्चिमेकडे काठावर उतरला. हा थवा होता सुंदर अशा राजहंस (Bar-headed Goose) पक्ष्यांचा. जलाशयाला अचानक कंठ फुटला आणि जलाशय एखाद्या प्रचंड जीवंत वस्तूसारखे वाटू लागले. राजहंस पक्ष्यांची रंगसंगती किती सुंदर असावी? पांढऱ्या – करड्या तपकिरी रंगाच्या बदकाएवढ्या आकाराच्या राजहंसाच्या डोक्यावर उतारावर दोन काळे आडवे पट्टे हे त्यास ओळखण्याची महत्वाची खुण.



राजहंस

जवळपास दोनशे राजहंस पक्ष्यांच्या या थव्यातील अर्धे पाण्यात तर अर्धे जलाशयाच्या काठावर दगड-धोंड्याच्या जमिनीवर उतरले. जवळपास एक हजार फुटावर मी काठावरच्या एका दगडी ढिगाऱ्यावर बसून छायाचित्रे घेण्यात गुंग झालो होतो. डोळ्यासमोर एवढे सारे सुंदर राजहंस त्यामुळे भान हरपल्यागत झाले होते. जणू काही भूल पडली होती. थोड्या वेळाने माझे लक्ष कॅमेरावरुन हटले आणि काठावरील एका बाभुळीच्या झाडाजवळ गेले. एक तरुण रोही नर झाडाच्या सावलीत उभा राहून कान टवकारुन एकसारखा आमचेकडे पाहात होता. काळ्या-राखोडी रंगाच्या या रोहीच्या गळयाजवळ पांढरा मोठा ठिपका आणि त्याखाली हातभर लांब केसांचा झुबका यामुळे रुबाबदार दिसत होता. निश्चितच तो तहानला असल्याने सुरक्षिततेचा अंदाज घेत होता.



पळस मैना

आम्ही अजिबात हालचाल न करण्याचे ठरवले. लवकरच रोहि नराला सुरक्षित वाटू लागल्याने तो झपाझप पावलं टाकत पाण्याकडे निघाला. पाण्याच्या अलीकडे पुन्हा एकदा थांबला. परिस्थिती न्याहाळली आणि पाण्याजवळ जावून गटागटा पाणी पिउ लागला. यावेळी कित्येक राजहंस पक्षी त्याच्या जवळ मुक्तपणे वावरत होते. कोठेही गडबड नाही. जणूकाही सगेसोयरे असल्यासरखेच वातावरण होते. मी मात्र या दृश्यात रमून निसर्गातील सहजीवनचा अनुभव घेत होतो. रानावनात किंवा जलाशयांवर निसर्गाचे असे अनेक रुपं, अनेक रंग कधीकधी पाहायला मिळतात. या अरण्यरंगात स्वत: ऐकरुप होणे ही एक वेगळीच अनुभूती असते. काही वेळातच रोहीने तृष्णा तृप्त होवून परतीचा मार्ग धरला आणि पलीकडच्या वनात पसार झाला.

आता जलाशयात काही राजहंस मनसोक्त विहार करत होते तर उर्वरित जलाशयाच्या काठावरील दगड-धोंड्याच्या कोरड्या जमिनीवर आपल्या चोचीने काहीतरी वेचून गिळत होते. तेथे गवती वनस्पती अजिबात नसल्याने मी दुर्बिनीतून सुक्ष्म निरीक्षण करत होतो. राजहंस तेथील दगडधोंडयातील रेती अथवा दगडाचे बारीक कण खात होते. असे दृश्य राजहंसाच्या बाबतीत यापूर्वी माझ्या तीन तपाच्या पक्षी निरीक्षणात मी कधीही पाहिले नव्हते त्यामुळे मला आश्चर्य वाटले.



राजहंस

मी या प्रसंगाचे काही विशेष छायाचित्रे आणि व्हिडीवो क्लीप घेतल्या. अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांच्या एका पुस्तकात चक्रवाक पक्षी पोर्णिमेच्या दुधाळ चंद्रप्रकाशात रेतीचे कण खाण्याबाबतची माहिती मी वाचल्याचे मला स्मरत होते. कोंबडा, तित्तर हे पक्षी असा प्रकार करतात हेसुध्दा माहित होते. मात्र राजहंस पक्ष्याबद्दल हे निरीक्षण प्रथमच अनुभवत होतो. याबाबचा विस्तृत अभ्यास करण्याचे मी मनात ठरवले. जवळपास तीन-चार तास एकाच ठिकाणी बसून काहीसा थकवा आला होता. उन्हेही काही प्रमाणात तळपाळयला लागली होती. जवळचे पाणी पिलो. थोडं शांत वाटले. आणि राजहंस पक्ष्यांना कुठलाही अडथळा न करता धरणाच्या मातीच्या भिंतीवरुन पलीकडच्या भागात निघालो.

या काठावरही काही राजहंस पाण्यात तर काही गवती वनस्पतीत आपले अन्न शोधत होते. चांगले छायाचित्र मिळविण्यासाठी मी त्यांचे अंतर हळूहळू कमी करण्याच्या प्रयत्नात होतो. एवढ्यात नजरेत धरणाच्या मध्यातून एक काळा कुत्रा तोंडात कुठला तरी पक्षी पकडून कोरड्या जमिनीवरुन पलीकडे जात असल्याचे निदर्शनास आले. माझी धावपळ त्या कुत्र्याचे छायाचित्र मिळविण्यासाठी सुरु होती. काही अंतरावर त्याने तोंडातील भक्ष्य खाली ठेवले आणि ते खाण्याचा प्रयत्न करु लागले.



एवढ्यात एक भला मोठा शिकारी पक्षी जमिनीवरुनच त्या कुत्र्याजवळ जाण्याचा प्रयत्न करु लागला. आणि काय आश्चर्य! पक्ष्याचा आकार आणि रंगसंगतीवरुन ते एक दुर्मिळ असे पांढरे गिधाड Egeptian Vulture होतं. विदर्भात हे गिधाड फार कमी वेळा दिसते. मी यापूर्वी ते मध्य प्रदेशात एका तपापूर्वी पाहिले होते. कुत्र्याच्या तोंडात असलेला पक्षी मात्र राजहंस होता. तो जखमी असावा त्यामुळे कुत्र्याने त्याची शिकार केली असावी. ती खाल्ल्यावर राहिलेली हाडं मिळावी या प्रयत्नात हे पांढरे गिधाड दिसत होते. बराच वेळ त्या दोघांचाही हा खेळ सुरु होता. कोण जाणे एवढ्यात त्या गिधाडाने आपले भले मोठे पंख उघडले आणि एक उड्डाण भरली. जलाशयावरील असंख्य पक्षी भयभित झाले. जीव वाचविण्याचा आटापिटा करु लागले. पळापळ सुरु झाली. शेकडो पक्ष्यांच्या पंखांच्या फडफडण्याने जलाशयावर वेगळेच दृश्य पाहावयास मिळत होते. आणि काही वेळातच गिधाड पलीकडच्या काठावर जावून बसले. परत एकदा जलाशय शांत झाले. आणि मीही परतीकडे पावलं वळवली.



पांढरे गिधाड

तांबड्या दगडमातीच्या जमिनीवरील बोरी,बाभळी आणि कडुनिंबाच्या विरळ जंगलातून दुचाकीने आम्ही निघालो. फर्लांगभर अंतरावर पोहचतो तोच केतनच्या मुखातून शब्द निघाले घुबड ! आमच्या जवळून दहा फुटावरच्या बाभळीवरुन त्याने एक उड्डाण भरली आणि पलीकडच्या हिरव्या शेतात उतरला. मी पायी धावपळ करत त्याचा पाठलाग करत होतो. कारण हेसुध्दा एक दुर्मिळ घुबड होते.



भारतीय हुमा घुबड

छायाचित्रासाठी माझा आटापिटा सुरुच होता. शेताजवळ पोहचताच त्याने परत तेथून एक उड्डाण भरली आणि दूरवर एका कडूनिंबाच्या झाडावर जावून बसलं. मी लपत छपत, धापा टाकत तेथे पोहचण्याचा प्रयत्न करु लागलो. शेवटी झाडापासून दोनशे फुटाजवळ पोहचून त्याचे छायाचित्र घेउ लागलो. ते कडुनिंबाच्या हिरव्यागर्द पानाच्या फांद्याच्या बोचक्यात सावलीत बसलं असल्याने कशीबशी छायाचित्र मिळाली. ते होतं शृंगी घुबड Indian Eagle Owl.

हुमा घुबड आकाराने घारीएवढे असून पायावर पिसे, शरीरावर गर्द तपकिरी रंग त्यावर बदामी काळया रंगाचे पट्टे दिसत होते. डोक्यावर शिंगासारखे पिसे आणि वैशिष्टय म्हणजे संपूर्ण चेहऱ्यावर काठाने बारीक काळी किनार, वटारलेल्या मोठ्या तांबड्या डोळयाच्या वर दोन काळया उभ्या रेषा. त्यात काळी चोच. बारीक निरीक्षण केले असता या घुबडाचा चेहरा 10 चा आकडा असलेल्या कोब्रा नागासारखा मला वाटला. पाच-सात मिनिटातच त्याने बु – बो असा आवाज काढला आणि तेथूनही एक मोठी उड्डाण भरली व दूरवर निघून गेला. आम्हीही परतीवर पावलं वळवळी. “क्षार” ही जवळ जवळ सर्वच प्राणिमात्रांची गरज आहे. यासाठी पशुपक्षी ते मिळविण्याचा प्रयत्न करत असतात. अन्न पचन होण्यासाठी कोंबडा, तित्तीर इ. पक्षी वाळू, दगडाचे कण खातात. परंतु देखणा राजहंस पक्षी असे दगडाचे कण खातांना मला प्रथमच निरीक्षणात आढळले. मी बऱ्याच पक्षी तज्ञांना, अभ्यासकांना याविषयी विचारणा केली. कोंबडा, तित्तर इ. पक्ष्यांच्या बाबतीत त्यांनी पाहिल्याचे वा माहित असल्याचे सांगितले.

परंतु राजहंसाबाबत असा प्रकार कोणीच ऐकल्याचे वा पाहिल्याचे सांगितले नाही. शेवटी मी बीएनएचएस (BNHS) च्या वरिष्ठ संशोध्क मित्रास याविषयी विचारणा केली असता त्यांनी माझ्या निरीक्षणाला दुजोरा दिला. राजहंस रेती, दगडाचे कण खातात असे त्यांनी सांगितले. आणि आज मी केलेले निरीक्षण हे अत्यंत मोलाचे असल्याने त्यांनी माझे कौतूकही केले. हा ठेवा अत्यंत महत्वाचे असल्याचेही त्यांनी सांगितले. सूर्य माध्यान्ही आला होता. उन्हाच्या झळा झोंबत होत्या. पोटात भुकेची जाणीव होवू लागली होती. मात्र आजच्या जंगल भ्रमणात निसर्गाने भरभरुन दिलं होतं. रानभूल पडावी तसा वन्यजीवांच्या निरीक्षणात भान हरपल्यासारखा बेधुंद होवून गेले होतो. परततांना नेहमीचा रस्ताही विसरलो.



राजहंस

कसाबसा नवीन रस्त्याने जंगला बाहेर पडून महामार्गावर एकदाचा पोहचून घरी पोहचलो.

कोरोनाच्या दहशतीत जवळपास एक वर्षे पूर्ण होवून गेले आहे. अमरावतीत तर दुसरी भयंकर लाट पसरल्याने सारी जनता भयभित झाली आहे. माणूस आपल्याच घरात बंदिस्त झाला आहे. वर्षभरापूर्वी सरकारी नोकरीतून सेवानिवृत्त झाल्याने मीही या काळात माणसाच्या गावात जाणे टाळून वन्यजीवांच्या रानावनात भटकंतीकरिता माझ्या आवडत्या छंदाला जास्तीत जास्त वेळ देवू लागलो. जंगलाची माहेरओढ मला गेल्या तीन तपापासून असली तरी यातून मला जो आनंद मिळतो, जे अरण्यज्ञान मिळते ते आपणा पर्यंत पोहचविण्याचा माझा प्रयत्न असतो. शेवटी असेच म्हणावेसे वाटते की, या रानाने लळा लाविला असा की. . . . .

***

. . . . .

## 2 तळ्यावरील शिकारनाट्य



मोर आणि बिबट

चैत्रपालवीच्या भल्या पहाटे दुचाकीने एका तळयाकडे निघालो. अमरावती-चांदूर रेल्वे रोडने वडाळीनंतर काही अंतरावर पुढयात उजव्या बाजूने एका झाडावर शिकारी पक्षी बसलेला दिसला. थांबलो. कॅमेरा हातात घेतला. तोच त्याने तेथून एक उड्डाण भरली व पलीकडच्या रानात निघून गेला. तरीपण थोडाफार पाठलाग करुन त्याचे छायाचित्र मिळविले. तो होता शुभ्र नयन तिसा. सकाळी सकाळी त्याचा शिकार शोध कार्यक्रम सुरु होता.

काही अंतरानंतर पुढे पोहरा गावातून डावीकडे कच्च्या रस्त्याने निघालो. रस्ता बराच खराब असल्याने कुठे कुठे थांबावे लागत होते. झुडूपी माळरानातून एका टेकडीच्या मध्यभागी पोहचलो. कॅमेरा, दुर्बिन आणि बॅग हातात घेतली व एका घसरत्या-उतरत्या पाऊलवाटेने थेट तळयाच्या काठावर उतरलो.

अहॉहा! किती सुंदर दृश्य नजरेसमोर दिसत होते. एखादे स्वप्नातीत चित्र वाटत होते. निसर्गाचं एवढं श्रीमंत रुप कधी कधीच अनुभवास मिळते. तळयावर निरव शांतता पसरली होती. चारही बाजूने अर्जुन, साग, बेहडा, जांभूळ, बहावा, चिंच इ. झाडं हिरव्या-कोवळया चैत्रपालवीने लदबदली होती. मोठमोठे अर्जुनाची झाडं आणि त्याच्या गर्द सावलीत काही वन्यजीव अन्न शोधत होते. तलावात अडई, हळदीकुंकु, पाणकावळा इ. पक्षी स्वच्छंद विहार करण्यात गुंग झाली होती. तळयाच्या उत्तर-पश्चिम काठावर चितळांचे दोन कळप सावधपणे आपली तृष्णा भागवत होते.



शिकारी आल्याची सूचना मिळताच चितळ आणि मोर

मोर-लांडोरीही पाण्यावर येत होत्या. मोराच्या मियॅऊ मियॅाउ आवाजाने तळयाला कंठ फुटला. पाठोपाठ एका मोठ्या शिंगाच्या चितळ नराच्याही ऑक् ऑक्ss आवाजाने रान भारुन गेलं. चितळ नर सुरक्षिततेच्या दृष्टीने कान व डोळयाने अंदाज घेत घेत तळयातील पाण्याकडे येत होता. थांबत थांबत शेवटी तोही पाण्यावर पोहचला. आपली येथेच्छ तृष्णातृप्ती केली. त्याच्या जवळच रानडुक्करांचा एक कळपही आपली तहान भागविण्यात मग्न झाला होता. डावीकडच्या वनराजीच्या छायेतून एक काळया-पांढऱ्या रंगाचा तरुण रोही रुबाबदारपणे चालत वारंवार सुरक्षिततेचा कानोसा घेत घेत. थांबत थाबत पाण्यावर पोहोचत होता. एकदाचा तो पाण्यावर पोहचला परंतु तहानलेला असूनही त्याने पाणी पिण्याची घाई केली नाही. कारण सुरक्षितता. माणूस सोडून इतर सर्व वन्यजीवांना क्षणाक्षणाला जिवाची भिती असते. कारण येथे दोनच प्रकार असतात शिकार आणि शिकारी. जवळपास पंधरा मिनीटे सुरक्षिततेचा अंदाज घेतल्यावर रोही पाणी पिउ लागला. पलीकडच्या काठावर एवढे सारे वन्यजीव एकाच ठिकाणी गुण्यागोविंदाने पाणी पित होते. यालाच अरण्यातील सहजीवन असे म्हणतात. एकमेकांच्या सोबतीने ते आपले अन्न - पाणी मिळवतात आणि शिकारी प्राणी दिसताच सर्वांना सतर्कही करतात. रोही पाणी पिऊन आल्या दिशेने परत पसार झाला. चितळ आणि राडुक्कर तेथेच हिरव्या गवतावर ताव मारत होते. निबिड अरण्यातील तळयावरील निरव शांततेत वन्यजीवांची वेगवेगळी रुपं मला पाहायला मिळत होती.



तृष्णा भागवतांना मोर

काही वेळ गेला अन् तलावच्या पूर्वेच्या झाडीतून एका मोराने मियॉऊ, मियॉऊ असा आर्त आवाज काढला. त्यासोबत तीन लांडोरीही होत्या. लगेच एका चितळ नरानेही ऑक्ss ऑक् वातावरण चिरणारा आवाज काढला. तळ्यावरील इतर वन्यजीव सावध होवून त्या दिशेने पाहू लागले. काही तरी शिकारी प्राण्याची चाहूल त्यांना लागली असावी. मी मात्र अलीकडच्या काठावरुन छायाचित्रे घेण्यात गुंग झालो होतो. एवढ्यात चेतनने दुर्बिनीतून त्या भागाचे निरिक्षण केले अन् तोंडून शब्द निघाले पप्पा, वाघ! लगेच मी दुर्बिन हातात घेतली व पाहू लागलो. काय आश्चर्य! एक बिबट अर्जुन वृक्षाच्या छायेत आपले पुढचे दोन पाय समोर पसरुन त्यावर आपली मान ठेवून मस्त पहुडला होता. मधेमधे शेपटीचा शेवटचा काही भाग हलवत होता. चेहराही किंचीतसा हलवत होता.



बिबट

बराच वेळ जाउनही बिबट फारसी हालचाल का करत नाही? याची मला शंका आली आणि परिसरावर बारीकपणे नजर फिरवली. तोच बिबटापासून अलीकडे डावीकडे दोन-तिनशे फुट अंतरावर एक मोर एका लहानशा दगडावर ऊभा राहून सतत बिबटाकडे पाहात होता. त्याच्या हालचालीवर नजर ठेवत मियॅाऊ मियॅाऊ आवाज काढत हळुवारपणे एक पाऊल टाकायचा आणि परत तेवढाच मागे घेत होता. दोघांचीही नजरानजर होत होती. बिबट मात्र मोराचे अंतर कमी कमी होण्याची वाट पाहात होता. कारण सावजावर झेप घेण्यास हे अंतर फार होते. बिबटाची

संपूर्ण नजर बारीकपणे मोराकडेच होती. माहित नसल्याचे सोंग बिबट मुद्दाम घेत होता. त्याच्या डोळयांच्या तिरप्या नजरेतून आणि हलकीसी मान वळविण्याच्या कृतीतून माझ्या लक्षात येत होते. शिकार आणि शिकारी यांचे शिकारनाट्य लवकरच पाहायला मिळणार याचा मला अंदाज आला होता.

आमचे पासून बिबटचे अंतर असावे दोन-अडीच हजार फुटाचे. आम्ही अलीकडच्या काठावर एका बाभूळीच्या छायेत तर तो पलीकडच्या काठावर होता. त्यातही तो झाडाच्या सावलीत बसला होता. एवढ्या अंतरावरुन त्याचे छायाचित्रे मिळवण्यात माझी दमछाक होत होती. तरीही श्वास रोखू रोखू छायाचित्रे घेणे सुरु होते. प्रसंग आणि क्षण दुर्मिळ असल्याने छायाचित्र अत्यंत आवश्यक होते. पाण्यावर आलेल्या तीन लांडोरीच्याही ही धोक्याची चाहूल लागली. मात्र मोरापेक्षा त्यांचे अंतर जास्त असल्याचे त्यांना फारसा धोका नव्हता. जवळपास अर्धा-पाऊण तास तळयाच्या काठावर असलेले वन्यजीव फारसी हालचाल न करता स्तब्धपणे उभे होते.

बिबट-मोर दोघांचेही एकमेकाकडे बारीक लक्ष सुरुच होते. मोरही जागचा हालायला तयार नव्हता आणि जास्त अंतरामुळे बिबटाला शिकार करण्यासाठी झेप घेता येत नव्हती. मी हे दृश्य अलीकडच्या काठावरुन श्वास रोखत रोखत पाहात होतो.



तळ्याच्या काठावरील सावज शोधतांना बिबट मादी

एवढ्यात बिबटाच्या मागच्या परिसरातून येणाऱ्या दोन मोरांना बिबट दिसला असावा. त्यांनीही मोठमोठ्याने आवाज काढणे सुरु केले. सर्व प्राणी आता अतिसावध झाले होते. एकमेकांना आपआपला धोक्याचा आवाज देत सावध करु लागले. शांत असलेलं तळं असुरक्षिततेमुळं एकाएकी जागं झालं. बिबटाच्या लक्षात ही बाब आली. तोही जागेवर हळूवारपणे ऊभा झाला आणि जवळच्याच बेशरमच्या एका मोठया झुडूपाकडे निघाला. आमचे सतत लक्ष त्याकडे होतेच. कार्य आश्चर्य! झुडूपात असलेली दोन पिल्लं तिच्याकडे धावत आली. जणू काही भक्ष्य आणलं काय असं विचारु लागली असावी. आम्ही एवढा वेळ ज्याला बिबट समजत होतो ती बिबट मादी निघाली. शिकारनाट्य अनिर्णित अवस्थेत संपले होते. लगेच बिबट मादी आणि तिची जवळपास दोन वर्षाची पिल्लं त्या बेशरमच्या झुडपातून गायब झाली आणि आम्हीही एक मोठा श्वास सोडला.

अमरावतीपासून पोहरा तलावाचे अंतर जवळपास 15 किलोमीटर आहे. 656 हेक्टर जंगल क्षेत्रातील या तळ्याचे क्षेत्र आठ हेक्टर एवढे आहे. तलावाचे काठावर अर्जुन, साग, चिंच, अमलतास, जांभूळ इ. प्रकारचे वृक्ष असून या जंगालात बिबट, रानडुक्कर, निलगाय, चितळ, चौसिंगा इ. वन्यप्राणी आहेत.तर सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये अजगर, नाग, मण्यार, धामण इ. आहेत. येथील पक्षीविश्वही समृध्द असून स्वर्गीय नर्तक, गोमेट, निलीमा, लहान टिबुकली, पांढऱ्या मानेचा करकोचा, घार, कापशी, शिक्रा, मोर-लांडोर, पांढऱ्या मानेची कोंबडी इ. पक्षी येथे दिसून येतात.

हे तळे म्हणजे एका निबिड अरण्यात निरव शांतता देणारं ठिकाण आहे. वन विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी या जंगलाचे संरक्षण व संवर्धन अतिशय तळमळीने केल्याचे जाणवते. कारण येथे वृक्षतोड अजिबात दिसत नाही. मानवी हस्तक्षेप नसणारे अरण्यातील हे तळे फक्त आणि फक्त वन्यप्राण्यांच्या अस्तित्वाने किती सुंदर दिसू शकते याचे हे जलाशय एक जीवंत उदाहरण आहे. मोठमोठ्या प्रसिध्द जंगलात जावून देखील तळ्यावरील वन्यजीवांची एवढी समृध्दी कुठे पाहायला मिळत नाही. अशी ठिकाणं पर्यावरण समृध्दीत मोलाचा हातभार लावत असतात.

***

# 3 व्याघ्रभूमि



पेंचचा एल मार्क नावाचा वाघ

वर्षा ऋतुला नुकतीच सुरवात झाली होती. दिगंतरात कृष्णमेघ आणि वाऱ्याची हातमिळवणी सुरु झाली. मृग नक्षत्राच्या आमगनातच वीजांच्या कडकडासह दोन वेळा पाऊस पडून गेला होता. मातीचा सुगंध दरवळला होता. अशातच पावलं मध्य प्रदेशातील पेंच राष्ट्रीय उद्यानात पडली. तुरीया प्रवेशव्दारातून आत प्रवेश करताच कोरोनामुळे जंगलात संसर्ग पसरु नये म्हणून पाणी आणि सेनिटायझरच्या एका डबक्यातून प्रत्येक जिप्सी अरण्यातील रानवाटेने निघत होत्या. जंगल कसं गच्च हिरव्या शालीत पांघरलं होतं. पावशा पक्ष्याचे पेर्तेव्हा, पेर्तेव्हा आवाज एकमेकांना साद प्रतिसाद देत होते. त्याच्या सोबतीला नुकतेच दक्षिणेकडून आगमन झालेल्या नवरंगाच्या गायनामुळे सारं जंगल भारुन गेलं होते. हा त्यांच्या विणीचा हंगाम असतो. मादीला पटवण्यासाठी त्याचा हा सारा आटापिटा असतो. काहीसे पुढे जात नाही तोच तीस-चाळीस चितळांचा कळप सकाळच्या पोट भरण कार्यक्रमात गुंग झाला होता. मात्र यातील चितळ नरसुध्दा वाफेवरील मादीचा गंध आल्याने जंगलातील वातावरण चिरणारा आवाज काढत होते. चितळांच्या कळपाच्या एका अगदी बाजूला रानवाटेच्या कडेने एका मयुराने आपला संपूर्ण पिसारा फुलवलेल्या थुई थुई नृत्याने लक्ष वेधले. अहॉहा... काय ते दृश्य? मोरपिसाऱ्यातील असंख्य नेत्र सृष्टीसौंदर्याची मोहिनी पाहाणाऱ्याच्या नेत्राला तृप्त करत होते. मोहित करत होते. काय ते रंग अन् काय ती नक्षी! सृष्टी निर्मात्यास साष्टांग प्रणाम. अरण्यातील वन्यजीवांच्या नवसृजनाच्या या सोहळयात सामील होण्याचा आनंद चैतन्यदायी होता.



मोरपिसारा फुलवितांना मोर

एके ठिकाणी रानवाटेच्च्या डावीकडे रानकुत्र्यांचं पाच जणांचं कुटूंब एकाच ठिकाणी मस्ती करतांना दिसले. तांबड्या रंगाच्या रानकुत्र्यांची शेपटी झुबकेदार असून टोकावर काळया रंग तर नाकापासून तोंडापर्यंत काळा रंग, नेहमी टवकारलेले कान. बहूतेक रात्री शिकारीवर ताव मारुन आराम केल्यानंतर ते मस्तीत आले होते. आमचा आणि त्यांचा रानवाटेने जवळपास तीन-चार किलोमीटरपर्यंत पाठलाग सुरु होता.

काही वेळाने आम्ही एका सुंदर हिरव्या तळयावर जावून पोहोचलो. तळयाभोवती हिरवेगार मखमली गवत पसरले आहे. तळयातील एका लहानशा बेटावर सांबराचा कळप शांतपणे आराम करत पहुडला होता. एवढ्यात काही वेळापूर्वी रानवाटेने आम्हाला दिसलेले रानकुत्र्याचे कुटूंब तेथे येवून पोहोचले. त्यांच्या उपस्थितीने सांबर, चितळ सावध झाले. त्यांच्यात अस्वस्थता पसरली. विखुरलेले सर्व सांबर एकत्र कळपात जमा झाले. लहान पाडसं कळपाच्या मध्यभागी झालीत. आम्हाला काहीतरी शिकारनाट्य पाहायला मिळणार या आशेत होतो. परंतु बराच वेळ गेला तरी रानकुत्र्यांनी शिकारीचा प्रयत्न केला नाही. आणि तळयाच्या काठाकाठाने ते अख्खं कुटूंब परतलं. रानावनात पसार झालं.



रानकुत्रा

काही अंतरानंतर जिप्सी चालकाला दुरुनच सांबराचा पॉक्, पॉक् आवाज ऐकू आला. एवढ्या वर्षाच्या सवयीने जंगलातील प्रत्येक हालचाल प्रत्येक आवाज यांच्या कानात पटकन येतो. वन्यजीवांच्या काही सवयी यांच्याही अंगवळणी पडतात. हा सांबराचा आवाज होता शिकारी प्राणी दिसल्याचा. लगेच उंच ऊंच झाडांच्या टोकावरुन वानरांच्या –हॅको, -हॅको आवाजाची स्पर्धा सुरु झाली. मागोमाग चितळांचे आवाज आल्याने जंगलातील सारी मृगवर्गीय जीव जागं झाले. जो तो प्राणी आपल्या सुरक्षेसाठी आटापिटा करु लागला. शिकार आणि शिकारी यांच्यात जीवन मृत्यूचा खेळ सुरु होणार होता. आमच्या चालकाने सर्व परिस्थिती हेरुन गाडी रानवाटेवर योग्य ठिकाणी आणून ऊभी केली. आम्ही सारे श्वास रोखून शांतपणे हातात कॅमेरे सज्ज ठेवून नजरा उजवीकडच्या वनराजीकडे वळविल्या. आमचा हा सारा आटापिटा होता जंगलाच्या राजाच्या दुर्लभ दर्शनाचा. अरण्य नावाच्या महामंदिरातील सर्वोच्च स्थानी असलेल्या वाघ या जीवंत देवाला कॅमेरात कैद करण्याचा. स्वत:च्या नजरेने पाहाण्याचा. अगदी आषाढी एकादशीला प्रत्येक वारकऱ्याला पांडूरंगाच्या दर्शनाची जशी आस लागते तशी.

प्रत्येकाच्या नजरा उजवीकडच्या झाडाझुडूपात भिरभिरु लागल्या. काही क्षण गेले आणि काय आश्चर्य! वृक्षराजीतून एक अस्पष्ट रुप हळूहळू स्पष्ट होवू लागले. अंतर असावे जवळपास पाच-सातशे फुटाचे. दुरुनच कॅमेरात खटाखट् आवाज सुरु झाले. अहॉहा! काय शाही रुबाब! दारायुक्त पिळदार शरिरयष्टी. भेदक नजर. तांबड्या पिवळ्या शरिरावर काळे लहान-मोठे पट्टे. ताठरलेल्या मिशा.



प्रत्येक आठ-दहा पावलानंतर झाडाझाडाच्या बुंध्यावर मूत्राची शिंपण करत करत आपले अधिवास क्षेत्र तो निश्चित करत होता. तो सरळ आमच्या समोरच्या गाडीसमोरुन रानवाट ओलांडून डावीकडच्या वनात प्रवेशला. या भागात जवळपास शंभर-दोनशे फुटापर्यंत मूत्रशिंपण करुन तो लगेच माघारी फिरला. आता तो सरळ आमच्या मागच्या बाजूने आला त्या दिशेने परत जावू लागला. जवळपास सात-आठ मिनीटांच्या उपस्थितीनंतर व्याघ्रराज निघून गेले. आमच्या आनंदाला उधाण आलं. आनंदाचे डोही आनंद तरंग……

हा होता इंग्रजी " L" मार्क नावाचा वाघ. वय जवळपास आठ वर्षे. चेहऱ्यावर डाव्या गालावर काळया रंगाच्या दोन रेषांची L नावाची खुण स्पष्ट दिसते. म्हणून या वाघाला "एल मार्क" असे नाव पडले आहे. पेंचमध्ये जवळपास 65 वाघ असून प्रत्येकाला वेगवेगळे नाव आहे. जशी लंगडी वाघीण. इ. हा लंगडी नावाच्याच वाघीणीचा मुलगा असून त्याचा पिता रैय्याकस्सा असल्याचे चौकशीत समजले. वाघाचे अधिवास क्षेत्र हे 5 चौरस किलोमीटर पासून ते वीस किलोमीटरपर्यंत असते. जंगलाचे एकूण भोगोलिक क्षेत्र आणि वाघांची एकूण संख्या यावर ते अवलंबून असते.

पुढे एका सुंदर हिरव्यागर्द बेटातील तळयावर सांबर आणि चितळाचे कळप आराम करत बसले होत. तर काही पाण्यात मनसोक्त विहार करत होते. वानरांचा एक कळपही येथे मनसोक्त मस्तीत रमला होता.



तळ्याच्या मध्यभागी शांतपणे बसलेला सांबराचा कळप




रानवाटेने काही अंतरानंतर एका ठिकाणी दोन सोनेरी कोल्हे (Golden Jackal) जमिनी उकरु उकरु त्यातील किडे-किटकांवर ताव मारत होते. यावेळी तेथे कावळे, मैना त्यांच्या तोंडाजवळ जावून किडे मिळवण्याचा प्रयत्न करत होते. आपण मिळविलेल्या अन्नात त्यांना मिळू नये म्हणून कधीकधी हे दान्हीही कोल्हे कावळे आणि मैनांवर उगीउगी झडप मारण्याचेही प्रयत्न करत होते.



सर्प गरुड

पुढे एका ठिकाणी गरुडाची शिळ ऐकू आली. एका तळ्याच्या पलीकडच्या काठावरच्या एका बोडख्या झाडाच्या फांदीवर एक सर्पगरुड बसला होता. एवढ्यात त्याने परत शिळ मारली. तोच उजवीकडून दोन सर्पगरुड मोठमोठ्याने शिळ मारत, आपले मोठमोठे पंख फडफडवत रानवाटेवरील एका ऊंच साग वृक्षावर येवून बसले. त्यात अजून एक सर्पगरुड आला. त्यानेही शिळ मारली. सर्पगरुडांच्या या शिळेने अख्या रानावर काहूर माजलं. सर्पगरुडाचा हा टापू मात्र माझ्या कायमचा स्मरणात राहिला.

सातपुडा गिरीपर्वर्तामध्ये पेंच हे राष्ट्रीय उद्यान मध्य प्रदेशातील सिवनी आणि छिंदवाडा या दोनही जिल्हयात येते. महाराष्ट्रातही या जंगलाचा काही भाग येतो. 758 चौरस किलोमिटर एवढे क्षेत्रफळ असलेल्या या राष्ट्रीय उद्यानाची स्थापना झाली. 292 चौरस किलोमिटर एवढे अतिसंरक्षित क्षेत्र असून बफर 465 चौरस किलोमिटर एवढे आहे. 1993 मध्ये याला टायगर रिझर्व्ह म्हणून घोषित करण्यात आले. यातून वाहाणाऱ्या पेंच नदीच्या नावावर या उद्यानाचे नाव पडले आहे. दरवर्षी 210 प्रकारचे पक्षी येथे येतात. जवळपास 1200 वनस्पती प्रजाती या अरण्यात आढळतात. 65 वाघ हे या जंगलाचे प्रमुख भूषण आहे. कर्माझरी आणि तुरिया अशे दोन प्रवेशव्दार या राष्ट्रीय उद्यानात आहेत. येथून दररोज शेकडो देशी विदेशी पर्यटक जंगल सफारीचा मनमुराद आनंद लुटतात. अरण्यातील रानवाटा सुरेख रेती पिवळी माती यांनी बनविलेल्या आहेत. अत्यंत चोख व्यवस्थापनाच्या बाबतीत मध्य प्रदेशातील पेंच, कान्हा आणि बांधवगड ही जंगलं गेल्या दोन दशकापासून पर्यटकांना आकर्षित करत आहेत. पर्यटनाच्या या भरभराटीस आलेल्या

ऊद्योगामुळे त्यावर आधारित निवास, हॉटेल, जिप्सी इ. उद्योग अत्यंत चांगल्या प्रकारे वाढले असून हा उद्योग शासनाला महसूल मिळविणारा प्रमुख उद्योग झाला आहे. महाराष्ट्राचे वन खाते हे व्यवस्थापन कधी स्वीकारणार ?

पृथ्वीतलावर सध्या एकूण 3,900 वाघ असून त्यापैकी एकट्या भारतात जवळपास तीन हजार आहेत. मध्य प्रदेशात सर्वात जास्त म्हणजे 526 वाघ असून त्याखालोखाल कर्नाटक 524 तर महाराष्ट्रात हिच संख्या 312 आहे.


भारतात 2006 मध्ये एकूण 1411, 2010 मध्ये 1706 तर 2014 मध्ये 2226 आणि आज जवळपास तीन हजार व्याघ्रराज आहेत. वाघ आहे म्हणून जंगल आहे आणि जंगल आहे म्हणून शुध्द हवा, पाणी आणि पर्यावरणाचा समतोल टिकून आहे. भारताला लाभलेला हा अनमोल असा समृध्द निसर्ग ठेवा जपण्याचा प्रत्येक नागरिकाने प्रयत्न केला पाहिजे. नव्हे प्रत्येकाचे ते कर्तव्य आहे.

पृथ्वीवरील दहा लाख वनस्पती लूप्त होण्याच्या बेतात आहेत. मानवजातीला याचे भयंकर परिणाम भोगावे लागतील असं 2019 च्या संयुक्त राष्ट्र संघांच्या जैवविविधता अहवालात म्हटलं आहे. मानवाने स्वत:हून ओढवून घेतलेली ही आपत्ती आहे. सध्याची मानवी वाटचाल निसर्गाच्या अंताकडे आहे. असं आता अनेक वैज्ञानिक सांगत आहेत.

जैविक विविधतेनं संपन्न अशा पेच राष्ट्रीय उद्यानाच्या भटकंतीत वाघ, बिबट, कोल्हे, रानकुत्रे, रानगवे तर मधूबाज, सर्पगरुड, शुभ्र नयन तिसा, हॉक ईगल, पल्लवपुच्छ कोतवाल, काळ्या डोक्याचा हळद्या, राजगिधाड इ. वन्यजीवांचं मनसोक्त दर्शन झालं. परततांना या व्याघ्रभूमितून पावलं माघारी फिरत नव्हते. एवढी रानओढ या जंगलाने लावली होती.

## 4 रानवाटा

मृग नक्षत्रास नुकतीच सुरवात झाली होती. नभात कृष्णमेघांची धावपळही सुरु होती. तसेही दोन दिवसापूर्वी मृगधारा बरसून गेल्या होत्या. त्यामुळे ग्रिष्माची लाही काही प्रमाणात कमी झाली होती. दोन तासापासून पोहरा तलावाच्या काठावरच्या वनराजीत नवरंग पक्ष्याचा पाठलाग करुन थकून गेलो होतो. ढगाळ वातावरण आणि कमी सूर्यप्रकाशामुळे नवरंग पक्ष्याचे पाहिजे तसे छायाचित्र टिपता आले नाही. कारण नवरंग तलावाच्या सभोवताल असलेल्या वृक्षराजीत इकडून तिकडे आणि तिकडून इकडे सतत उड्डाण करत होता. त्यामुळे पलिकडच्या काठावर जाणे अडचणीचे होत होते.



अरण्यातील रानवाटेवर चितळ मादी आपल्या पाडसासोबत

शेवटी काही वेळ थांबून तेथून जवळच्याच बोडणा जंगलाकडे जाण्यास निघालो.

अमरावती-चांदूर रेल्वे मुख्य रस्त्यावरील बोडणा जंगलाच्या प्रवेशव्दारातून आत प्रवेश केला. दूरवरुन मोराचे मियॅाउ, मियॅाउ तर पावशा पक्ष्याचे पेर्तेव्हा, पेर्तेव्हा आवाज येवू लागले. चार पावलं पडत नाही तोच रानवाटेवर लालसर मखमली देवगाई (Red velvet mite) नजरेत पडल्या. याला मृगकिडा असेही म्हणतात. खूप वर्षानंतर या देवगाईचे दर्शन झाल्यामुळे मनोमन आनंद झाला.



मखमली देवगाय

वर्षभर जमिनीत राहाणाऱ्या ह्या देवगाई दरवर्षी बरोबर मृगधारा बरसल्या की जमिनीतून वर येतात. हा काळ त्यांचा मिलनकाळ असतो. नर गवताच्या पात्यावर आपले शुक्राणू सोडतो. त्यावर मादी बसते व सहवासाची क्रिया पूर्ण करते. मिलन कार्य आणि अंड्यातून बाहेर आलेली पिल्लं मोठी झाली की परत त्या जमिनीत अंतर्धान पावतात. काही दिवसांचाच त्यांचा हा जमिनीवरील कार्यक्रम असतो. त्यांच्या लाल भडक रंगामुळे आणि मुखमली शरीरामुळे शिकारी बहूधा त्यांचेवर आक्रमण करत नाहीत. हा मृगकिडा जवळपास कोळ्यासारखा(Spider) दिसतो. याला आठ पाय असतात. चार-पाच दशकांपूर्वी लहानपणी गावागावात या काळात त्या दिसायच्या. त्यांना हलक्या हाताने पकडून रिकाम्या आगपेटीत घालून घरी आणायचे दिवस आठवले. अलीकडच्या दोन-तीन दशकांपासून शेतपिकांवर किडनियंत्रण आणि पिकांच्या वाढीसाठी रसायनांचा बेसुमार वापर वाढल्यामुळे यांची कुळे नष्ट होत असून ही प्रजाती नष्ट होण्याच्या मार्गावर आहे.. गावातून, शेतीतून त्या नाहिशा झाल्या आहेत. तसेच मानवी वसाहतीसाठी जंगल आणि शेतीचा –हासही यास कारणीभूत आहे. पर्यावरण सतोलासाठी निसर्गचक्रात या मृगकिड्याची फार मोठी भूमिका आहे. पालापाचोळा कुजविण्यासाठी आणि मातीला सुपीक करण्यात याचा मोठा वाटा आहे. बुरशीवरील भक्षकांची अंडी हे या किड्याचं खाद्य आहे. पुढे रानवाटेवर बऱ्याच अंतरापयंत असंख्य देवगाई दिसून आल्या. लाल लाल कुंकू लावलेली ही रानवाट एक वेगळीच अनुभूती देत होती.

रानवाटेवर जसजशी पुढे पुढे पावलं पडत होती तसतशा मोर-लांडोरच्या हालचाली नजरेत पडू लागल्या. एका चढावरुन खाली उतरता उतरता समोर एक मोर आपला संपूर्ण पिसारा उघडून थुई थुई नाचण्यात बेधुंद झाला होता.

त्याच्या पिसाऱ्यातील शेकडो मोरपीसात असंख्य नेत्र उघडल्यासारखे ते दृश्य मनाला मोहित करत होते. जणू काही ते सृष्टीचेच नेत्र वाटतात. बाजूलाच चार लांडोरी मोराकडे लक्ष नसल्यासारख्या भासवत होत्या. मात्र मोर या काळात अशा अवस्थेत एवढा अत्यानंदीत का होत असावा? मोर-लांडोरचा हा मिलनकाळ असतो. आपल्या फुललेल्या पिसाऱ्यातून तो आपल्या सौंदर्याचे आणि शक्तीचे प्रदर्शन जणू करत असतो. लांडोरीला पटवण्यासाठी त्याचा हा सारा आटापिटा असतो. निसर्गाने पक्षीकुळात मादीपेक्षा नराला जास्त सौंदर्य दिलेले आहे. जेवढे नराचे सौंदर्य अधिक तेवढ्या माद्या त्याचेकडून जिनोबा (जनुकं) मिळविण्याचा प्रयत्न करतात. पिल्लाच्या रुपात त्याचेसारखाच वंश आपल्या पोटात वाढावा, जन्म झाल्यावर प्रतिकूल परिस्थितीतही आपले अस्तित्व टिकवून ठेवावा, असा मादीचा प्रयत्न असतो. आणि नराचा उद्देश आपल्यातील जिनोबाचा जास्तीत जास्त माद्यांमधून प्रसार व्हावा,असा असतो. ज्या रानवाटेवर मयूराचे हे नृत्य दिसून येते त्या रानवाटेचे स्वर्गीय सौंदर्य पाहाण्याची मजा काही ओरच असते. मी ते आज मनसोक्त अनुभवत होतो.

पुढे काही अंतरावर अुजव्या बाजूला बाजूला एक नैसर्गिक पाणवठा नजरेत पडला. याचे पाणी जरी आटले होते तरी मातीत बऱ्याच प्रमाणात ओलावा कायम होता. त्यामुळे दयाळ, कोतवाल, स्वर्गीय नर्तक, मूनिया, गोमेट, बुलबुल इ. पक्ष्यांची येथे रेलचेल दिसून आली. एवढ्यात डोक्यावरुन मोठमोठ्या पंखानी फडफडत शिकारी मधूबाज पक्षी पलीकडच्या वृक्षराजीकडे पसार झाला.

येथून पुढे जातांना चितळाचा एक कळप एकाएकी चौखुर उधळला. उजवीकडच्या वनातून रानवाट ओलांडून हा कळप डावीकडच्या वनराजीत पसार झाला. बहुतेक पाणवठयावरुन तृष्णातृप्ती भागवून तो कळप परतला असावा. पुढे परत मोर-लांडोर आणि चितळांचा कळप दिसून आला. बरेच अंतर चालून गेल्यानंतर रानवाटेच्या उजवीकडे एका पायवाटेने आम्ही निघालो. हा काहीसा उंच सखल परिसर होता. वाळलेल्या वृक्षवेली आणि झाडाझुडूपातून एका नाल्याच्या वरच्या भागात पोहोचलो. वाळलेल्या झाडाझुडपाच्या मोठ्या खिडकीसारख्या भोकदाडातून पाहातो तो पुढ्यात एक नवीन दृश्य नजरेत पडले. खाली दोनशे फुटावर एका मोठा सिमेंटनी बांधलेल्या पाणवठ्यात जवळपास तीन फुट पाण्यात एक चितळ स्थितप्रज्ञासारखे उभे होते. फक्त कान आणि शेपटीची हलकीसी हालचाल ते करत होते. मी व पक्षीतज्ञ सुरेश खांडेकर सरांच्या उपस्थितीची जाणीव त्याला होवूनही त्याने तेथून पळण्याचा यत्किंचीतही प्रयत्न केला नाही. अर्धा-पाऊण तास होवूनही ते आहे त्याच अवस्थेत होते. त्यामुळे मनात शंका आली. एकतर ते भयंकर जखमी असावे. वेदनेचा त्रास कमी व्हावा या हेतूने वन्यजीव पाण्यात याप्रकारे उभे राहातात. किंवा ते एखाद्या दुर्धर आजाराने पिडीत असावे. जेणेकरुन आपला त्रास थोडा फार कमी होईल असा प्रयत्न असतो. अशा वेळी एखादा शिकारी प्राणी येवून आपली शिकार करेल, याचेही त्यांना भान नसते. एकप्रकारे आपल्या मृत्यूचीच तो वाट पाहात असतो. काही वेळ थांबून परत रानवाटेवर येवून पाणवठ्याच्या म्हणजेच पाणवठ्यातील त्या चितळाच्या समोरच्या भागात गेलो. येथेही त्याच्या समोर वीस फुट अंतरावर जावूनही ते हालायला तयार नव्हते.



यावरुन ते चितळ नक्कीच गंभीर आजारी असल्याची पक्की खात्री झाली. त्यामुळे आम्हीही तेथून लवकरच पावलं परतीवर वळवलीत.

परतीच्या मार्गावर रानवाटेवरच्या लहान सहान दगड धोंडयातून चालता चालता बराच तोल सांभाळावा लागत होता. थोडे अंतर पुढे गेल्या रानवाटेच्या उजव्या बाजूला गवती झुडूपातून एक घोरपड (Monitor Lizard) येतांना दिसली. मी आहे त्याच ठिकाणी उभा राहून त्याचे छायचित्रे घेत होतो. आपली लांब फाटेदार जीभ बाहेर काढत काढत ती भक्ष्याच्या शोधात होती. जवळपास ही घोरपड तीन साडेतीन फुट लांबीची होती. क्षणभरातच ती माझ्या उजव्या बाजूने अवघ्या दहा फुटावर येवून पोहचली. माझी आणि घोरपडीची नजरा नजरही झाली आणि असुरक्षित वाटू लागल्याने ती वरच्या भागाकडे जायला वळली. कदाचित रानवाट ओलांडून ती पाणी पिण्यासाठी नैसर्गिक पाणवठ्याकडे जात असावी. परंतु आमच्या उपस्थितीने तीने आपला मार्ग बदलला असावा.

‘रानवाटा’ ह्या जंगलाच्या जीवनरेषा असतात. त्या तुम्हाला अरण्यगर्भाकिडे घेवून जाणाऱ्या असतात. रानवाटेवरील जीव तुम्हाला त्या गर्भगृहाकडे नेण्यासाठी आकर्षित करत असतात. जणू ते सृष्टीचे रहस्य शोधण्यासाठी तुम्हाला खुणावत असतात. साद घालत असतात.



घोरपड

रानवाटेवरील वन्यजीवांच्या पाऊलखुणा, विष्ठा, झाडांवरील नखांचे ओरखडे, पक्ष्यांचे आवाज हे या वन्यजीवांचे त्या जंगलातील अस्तित्व दाखवत असतात. आणि यावरुनच जंगलातील जैवविविधतेची समृध्दता लक्षात येते. रानावनाची प्रत्येक भटकंती तुम्हाला पावला पावलावर निसर्ग सौंदर्याचे वेगवेगळे दर्शन देत असते. फक्त ती निस्वार्थ शोधवृत्ती तुमच्या जवळ असली पाहिजे.

***

# 5 ‘ भुलनवेल ’

जवळपास दहा वर्षापूर्वीच्या जंगल भ्रमंतीतील गोष्ट. मेळघाटच्या विशिष्ट अरण्यात माझी भटकंती सुरु होती. नभ पाऊसमेघांनी झाकलं होतं. आषाढ महिन्याचा रिमझिम पाऊस सुरु होता. कृष्णमेघांतून पडणाऱ्या आषाढधारांनी अंग पूर्णपणे चिंब भिजलं होतं. सारं अरण्य हिरव्या रंगात न्हावून निघालं होतं. रानवाटाही चिंब भिजल्या होत्या.



हिच ती जंगलात ओलांडली असता भूल पाडणारी भुलनवेल

काही वेळाने अभिषेकने बोट दाखवून थांबवलं. रानवाटेच्या डाव्या कडेने काही पावलं पुढे जाताच ज्या रहस्यमय वेलीच्या शोधात मी गेल्या अनेक वर्षापासुन होतो ती अत्यंत दुर्मिळ वेलवर्गीय वनस्पती नजरेत पडली. ही वेल पूर्णपणे जमीनीवर पसरली होती. तीची पानं खायच्या पानाएवढी परंतु रुईच्या पानासारखी जाड हिरवट रंगाची असून त्यावर हलकीसी कृष्णछटा पसरली होती. तीच्या शाखा उपशाखा जमिनीवर दहाही दिशात विखुरल्या होत्या. सर्वात मोठया पानाची लांबी अंदाजे चार इंच तर रुंदी जवळपास तीन इंच एवढे असून तीचा पसारा अंदाजे एक मीटर व्यासाएवढा

पसरलेला होता. होय. हीच ती वेलवर्गीय रहस्यमय वनस्पती म्हणजे ‘भुलनवेल’ होय. या वेलीचे इंग्रजी नाव ‘टायलोफ्लोरा रोटँडीफोलियो’ असे आहे.

‘भुलनवेल’ या रहस्यमय वेलीबाबत एका पुस्तकात वाचलेली आणि जंगल भ्रमंतीत काही वनाधिकाऱ्यांकडून ऐकलेली महत्वपूर्ण बाब म्हणजे ही वेल ओलांडली म्हणजे भूल पडते. दिशेचं ज्ञान नाहिसं होतं. ती ओलांडणाऱ्याला एक प्रकारची ‘ रानभूल ’ होते. ज्या प्रमाणात या वेलीतून निघणारा वायू ओलांडणाऱ्याच्या श्वासावाटे नाकात जेवढया प्रमाणात जातो त्या प्रमाणात भुलीचे प्रमाण असते. एक प्रकारे भुलनवेलीतून निघाऱ्या वायूमध्ये ॲनास्थाशियासारखा ‘भूल’ पाडणारा काहीतरी घटक असावा. म्हणून रानभूल पडत असावी. परंतु या गोष्टीला कुठलाही शास्त्रीय आधार नाही. खूप वर्षाच्या शोधानंतर मला दहा वर्षापूर्वी या वेलीचा शोध लागला. तिच्या जवळ बसून बराच वेळ निरीक्षण केले. भरपूर छायाचित्र घेतली. मला मात्र कशाचीच भूल पडली नाही.

‘भुलनवेल’ ही रुई कुळातील (ASCLEPIACEAE) असून तीचे दोन प्रकार आहेत. एक पांढऱ्या फुलांची तर दुसरी काळया फुलांची. मेळघाटात मात्र केवळ पांढऱ्या फुलांची भुलनवेल आहे. या वेलीत काही आयुर्वेदीय औषधीचे गुण आहेत जे अस्थमाच्या आजारावर गुणकारी आहेत, असे काही आयुर्वेदाचार्य सांगतात. प्रभाकर चिकित्सा या आयुर्वेद ग्रंथात या वेलीबाबत ‘भ्रम पडण्याचा संभव होतो आणि 48 तास भटकत राहतो’, असा उल्लेख आहे. मुख्य मुळापासून प्रत्येक शाखेला अंदाजे 10 ते 12 इंच अंतरावर उपमूळ असते.

प्रल्हाद जाधव लिखित ‘रानभूल’ या पुस्तकातील ‘दिशा उजळतांना’ या प्रकरणात वन खात्यातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने भुलनवेल ओलांडली असता ते दोन दिवस जंगलात भटकले होते, असा उल्लेख आहे. याच लेखात पुढे असेही नमूद केले आहे की, अरण्यव्रती मारुती चितमपल्ली यांनी एकदा या वेलीची छायाचित्रे घेतली होती. पण रोल धुतल्यावर ती छायाचित्रे उमटली नाहीत. माझा रानकाढया नानूनेही एकदा या वेलीवर एक दगड ठेवला होता काही दिवसानंतर तो दगड बाजूला सरकला गेल्याचे त्याने मला सांगितले होते. माझ्या मते कुठल्या तरी प्राण्याच्या पायाच्या हालचालीमुळे तो बाजूला सरकला असावा. नांदेड जिल्हयात किनवट तालुक्यात ‘भुलजा’ नावाचे एक गाव आहे. तेथेही अशा वनस्पती ओलांडल्यामुळे माणसं भ्रमिष्ट होतात, अशीही माहिती रानभूल या पुस्तकात पुढे दिली आहे.

लहानपणी एकदा मी स्वत: सांजवेळी असाच रानावनात जवळपास तीन-चार तास भटकलो होतो. रानावर सर्वत्र अंधारछाया दाटली होती. माझं दिशेचं ज्ञान नाहिसं झालं होतं. वाट मिळेल तिकडे सैरावरा पळत होतो. कदाचित यामागे अशीच एखादी वेलवर्गीय वनस्पती माझेकडूनही ओलांडली गेली असावी. मी रानभूल विषयी काही जुन्या जाणत्या मंडळींनासुध्दा विचारणा केली आहे. माझ्या परिसरात असलेले आणि गेल्या वीस वर्षापूर्वी सेवानिवृत्त झालेले शिक्षक तथा ज्येष्ठ लेखक आदरणिय राम देशमुख यांचेशी याबाबत केलेल्या चर्चेत सांगितले की, त्यांच्या काळात शिक्षकांना चार चार मैल दूरवरच्या शाळेत शिकवायला पायी जावे लागायचे. अशाच दोन प्रसंगात जंगल आणि शेतातून पायवाट असलेल्या भागात अशीच रानभूल त्यांनाही पडली असल्याचे ते सांगतात. अकरा वाजता शाळेत पोहचण्याऐवजी

दुपारी दोन तीन वाजून गेले होते. त्यांच्या काळात अशा प्रकाराला ‘चकवा’ असे संबोधल्या जात होते. इतरही काही मंडळीकडून असेच अनुभव ऐकायला मिळाले. परंतु माझे यापूर्वी प्रकाशित झालेले ‘भुलनवेल’ हे पुतक त्यांनी वाचले. त्यानंतर त्यांचंही असे म्हणणे पटले की, रानावनात अशा रानभूल पाडणाऱ्या काही वनस्पती असाव्यात. ज्या ओलांडल्या म्हणजे दिशेचं ज्ञान नाहीसं होत असावं.

अथक प्रयत्नानंतर मला जेव्हा मेळघाटात ‘भुलनवेल’ या रहस्यमय वेलवर्गीय वनस्पतीचा शोध लागला त्यानंतर मी या वेलीबद्दलचे शोधकार्य पुढे नेण्याचे ठरवले. पहिल्याच शोधानंतर त्यावर दै.महाराष्ट्र टाइम्समध्ये विस्तृत लेख लिहून तो छापूनही आला. त्यानंतर बऱ्याच जाणकारांचे आणि आयुर्वेदाचार्यांचे दूरध्वनी आले. ते मला या वेलीविषयी ठिकाणाची माहिती मागत होते. परंतु भुलनवेलीच्या संरक्षण आणि संवर्धनाला प्राधान्य देवून मी कुणालाही या वेलीचे ठिकाण अद्यापपर्यंत सांगितले नाही. मात्र वेलीबद्दलची शोधयात्रा आणि पाठपुरावा करण्याचे दृष्टीने माझे प्रयत्न सुरु होते. तीचा संपूर्ण अभ्यास करुन लॅबमध्ये तीचे पुढील संशोधन करुन असा कोणता तरी घटक या वेलीत आहे काय यादृष्टीने माझे प्रयत्न सुरु असतांनाच मला एका दुर्देवी प्रसंगाला सामोरे जावे लागले. अभिषेक वाकोडे या तरुण वनरक्षकाचा अस्वलाच्या हल्ल्यात दुर्देवी मृत्यू झाला. माझे भुलनवेल या विषयावरील संशोधनही तेथेच थांबले. परंतु माझ्या अनुभवाप्रमाणे मी व माझा रानसखा आम्ही दोघेही जवळपास या वेलीच्या सहवासात साधारणपणे अर्धा तास वेळ घालवला परंतु आमच्यापैकी कोणालाही अशा प्रकारची भूल पडल्याचे मला आठवत नाही. मात्र या दुर्मिळ

वेलीच्या संरक्षण आणि संवर्धनाकरिता पूर्वजांनी अशा प्रकारच्या कथा कल्पना रचल्या त्या जैवविविधतेच्या रक्षणाच्या दृष्टीने हितकारकच आहेत, असे मला वाटते. भुलनवेलीचा शोध हे एक निमित्त आहे.

मात्र ही वेल दमाच्या आणि श्वसनाच्या आजारावर अतिशय उपयुक्त असून आयुर्वेदात तीचे अनन्यसाधारण महत्व आहे. ‘भुलनवेल’ सारख्या अनेक रहस्यमय वेली-वनस्पतीच्या रक्षणाच्या दृष्टीने पूर्वजांनी तीचे जतन आणि संरक्षण व्हावे म्हणून कदाचित ही युक्ती वापरली असावी. या पृथ्वीतलावरील प्रत्येक वनस्पतीचे, वृक्षलतांचे संरक्षण आणि संवर्धन होणे हा या मागील प्रमुख उद्देश असावा. पृथ्वीतलावरील सजीवसृष्टीसाठी ही बाब अत्यंत महत्वपूर्ण ठरते.

. . . . .


6 सोयरे वनचरे...

मानव आणि जंगलाचं नातं अनादी काळापासून चालत आले आहे. आपले पूर्वज तर निसर्ग पूजकच होते. जंगलात किंवा जंगला शेजारी राहाणारे आदिवासींची जीवन पध्दती आजही वनांवरच अवलंबून आहे. त्याकाळी जीवनाला आवश्यक त्या प्राथमिक सर्व गरजा ही वनेच पुरवित असे. सांगायचे झाल्यास वनापासून अन्न,पाणी,निवारा सहजगत्या मिळायचे. त्यामुळे वृक्षराजी आणि पशुपक्ष्यांचे महत्व त्यांना तेव्हाच कळले होते. मग आताच्या आधूनिक मानवाला काय झाले? सरकार, वन व वन्यजीवांच्या संरक्षण आणि संवर्धनासाठी काम करणाऱ्या कित्येक संस्था आणि व्यक्ती ही सर्व मंडळी मोठ्या प्रमाणावर काम करीत असूनही वन संवर्धना विषयी प्रत्येक जन अजूनही पाहिजे तसा जागरुक का होत नसावा?

रखरखत्या ग्रिष्माचे मे महिन्याचे लाहीलाही करणाऱ्या वातावरणाचे ते दिवस. वन्यजीव प्रगणनेत एकसारखा तीन दिवस घालवून परतीचा प्रवास सुरु करायचा होता. वेळ भर दुपारची. जंगलातील एका मुक्कामाच्या ठिकाणाहून एकटाच तृणमेळयातून पायी निघालो. गवताचं बी ठोंबातून फुटून जमिनीवर पडले होते. उन्हामुळं पक्षीकुळं एखाद दुसऱ्या हिरव्या झाडांवर शांतपणे पहुडली होती. एखादी माळचिमणी तृणांमधील अन्न शोधतांना दिसत होती. माझ्या उपस्थितीनं ती पुढं पुढं उडत जात होती.

जवळपास दोन-तीन फर्लांगभर अंतरानंतर तृणमेळयातील पायवाटेने एका ओढयाच्या काठावर येवून पोहचलो. तेथून नाल्यात उतरण्यासाठी दहा-बारा फुटाची घसरण होती. सर्वत्र निरव शांतता पसरली होती. मी तोल सांभाळत

हळूवार पावलांनी नाल्यात उतरलो आणि एकाएकी निशब्द झालो. अंगावरचे केस ताठरले. उजव्या हातावर जवळपास पाच-सहाशे फुटावरील पाणवठयातून व्याघ्रराज उठून पलीकडे निघाले होते. त्याचे शरीर पाणी आणि चिखलाने माखले होते. अंगावरचे पाणी चालता चालता जमिनीवर टपकत होते. व्याघ्रराज पाणवठयातून उठताच सर्वत्र असलेली शांतता एकाएकी भंग पावली. झाडाझाडांवरुन वानरांचे –हॅको –हॅको आवाज, मोराचे केकारणे, सांबर कळपातील नराचे सावधपणे कान टवकारुन हळूवारपणे पुढचे पाय उचलून जमिनीवर आपटणे आणि रानकोंबडयाचे कुटूंबासह वाळलेल्या पानापानावरुन पळणे इ.हालचाली अचानक वाढल्या होत्या. नाल्यातील आणि त्याभोवतीच्या परिसरातील वन्यजीवन भयभित झालं होतं. जो तो जीव वाचविण्याच्या प्रयत्नात होता. “ वाघ “ ज्या-ज्या दिशेने जात होता त्या भागात ही वन्यजीवांची धावपळ अधिकच वाढत चालली होती. मी मात्र हे सर्व दृश्य अचंबित होवून एकाच ठिकाणी उभं राहून पाहात होतो. सारं भान हरपून गेलं होतं. त्या एक मिनीटात गळयातून कॅमेरा हातात घेवून व्याघ्रराजाचे छायाचित्र घेण्याचे भानही मला राहले नाही. काही क्षणात जंगलाचा राजा परिसरातून निघून गेला आणि मी मात्र आनंदानं बेभान होवून माझ्या पडावकडे परतीवर फिरलो. माणसाच्या वाढत्या बेसुमार लोकसंख्यावाढीमुळे जंगलाचा –हास आणि पशुपक्ष्यांचे अधिवास नष्ट करुन सिमेंट कॉँग्रीटची जंगलं उभारणे हे येणाऱ्या पिढ्यासाठी अत्यंत घातक ठरणार आहे. याचसोबत विकासाकरिता उभे होणारे रस्ते, उद्योगधंदे, वाहने इ.मुळे होणारे प्रदुषण आणि वाघाच्या शिकारी यामुळे देशातीलच नव्हेतर संबंध पृथ्वीतलावरील जंगलं ओरबाडली जावू लागली आहेत.



वाघासहीत इतर पशुपक्ष्यांच्या शिकारी वाढल्या. परिणामी पर्यावरण असंतुलन निर्माण होवू लागल्याने त्याचे भिषण परिणामही अलीकडच्या दोन-तीन दशकापासून जगभर दिसू लागले आहेत. आधुनिकीकरणामुळे एकीकडे माणसाचा विकास होत असून दुसरीकडे मात्र निसर्ग भकास होत चालला आहे. या दोघांचे संतुलन साधणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

पर्यावरण संतुलच्या दृष्टीने अभयारण्य, व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने ही संकल्पना आकारास आली. भारतात जवळपास पाचशेच्या वर अभयारण्य, शंभरावर राष्ट्रीय उद्यान आणि पन्नासच्या जवळपास व्याघ्र प्रकल्प आहेत. यापैकी महाराष्ट्रात पंच्चेचाळीस अभयारण्य, सहा राष्ट्रीय उद्यान आणि सहा व्याघ्र प्रकल्प आहेत. याचा फायदाही झाला. परंतु हळूहळू अशा जंगलांचा –हास सुरु झाला. वाघाच्या शिकारी होवू लागल्या. ज्या जंगलातील वाघ कमी होवू लागले. अशा वनांचा नाश मानवाकडूनच सुरु झाला. कारण भिती नावाची बाबच नष्ट होत चालली आहे. पृथ्वीतलावर असलेल्या एकूण वाघांपैकी निम्म्यापेक्षा जास्त वाघ आपल्या देशात आहेत या भ्रमातच आपण राहाणार?

“वाघ” आहे म्हणून जंगल आहे आणि जंगल आहे म्हणून पाणी आहे. जगण्याकरिता अत्यंत आवश्यक असलेला शुध्द ऑक्सीजन आहे. त्याचप्रमाणे ‘पाणी आहे म्हणून झाडे नाहीत तर झाडे आहेत म्हणूनच पाणी आहे’, याची पक्की जाणीव झाली पाहिजे. निसर्गावर प्रेम केल्याने क्रोध, मत्सर, स्वार्थ नाहिसे होतात आणि हळूहळू विश्वकल्याणाचा ध्यास लागतो.



एवढी शक्ती या वृक्षराजीमध्ये आणि अरण्यामध्ये, अभयारण्यामध्ये आहे. मात्र त्यावर मनापासून निस्वार्थपणे प्रेम करणे आवश्यक आहे.

प्राणी, पक्षी हे सतत जंगलं वाढवत असतात. वन्यजीव झाडांच्या खाल्लेल्या फळांच्या बिया आपल्या विष्ठेतून अरण्यभूमिवर टाकतात. पक्षीही फळांच्या बिया आपल्या विष्ठेतून दूरदूरपर्यंत टाकतात. जमिनीत त्या रुजतात. पाऊस पडला म्हणजे त्या अंकुरतात. वाढतात. आणि हळूहळू त्या इवल्याशा रोपांच्या वृक्षलता तयार होतात. त्यामुळं जंगलं वाढतात. पशुपक्ष्यांना, किडे कीटकांना निवाऱ्यासाठी जागा मिळतात. पोटासाठी अन्न मिळते. आपली कुळं वाढविण्यासाठी अधिवास मिळतो. यामुळेच पशुपक्षी, वन्यप्राणी पर्यावरणाचं संतुलन साधत असतात. माणूस मात्र या जंगलांवर सतत कु-हाड चालवत असतो.

एक झाड आपल्या आयुष्यात ३५ लाख रुपयाच्या किंमतीचे वायु प्रदूषण टाळते. १५ लाख रु. किंमतीचे ऑक्सीजनचे उत्पादन करते. ४० लाख रुपयांच्या पाण्याचे रिसायकलिंग करते. तीन किलो कार्बनचा एका वर्षात नाश करते. एक परिपूर्ण झाड एक हजार माणसांचे जेवण शिजवून तयार करते. तर असंख्य पक्षी किटकांना निवारा देवून त्यांची अन्नपाण्याची

गरजही भागवते. हे पवित्र कार्य झाडं आपल्या संबंध आयुष्यभर एकाच ठिकाणी ऊभं राहून उन, वारा, पाऊस अंगावर झेलून करत असतात. जीवनभर ते फक्त देण्याचच कार्य करतात. कर्मयोग्याचं मूर्तिमंत रुप म्हणजे ही वृक्षवल्लरी होय.

वृक्षलता, पशुपक्ष्यांशी सोयरिक जोडणारे संतकवी तुकाराम महाराज हे खरे पर्यावरणवादी होते. जेव्हा ते एकांत वासात देहूच्या डोंगरावर जात असे तेव्हा ते त्या डोंगरावरील वनराई, पशुपक्ष्यांशी तादात्म्य पावत की ते वृक्षराजी, पशुपक्षी हे बंधूसखा भगिनी, माता पिता सखी वाटत असे. मनातील सुख दु:ख त्यांच्याजवळ व्यक्त करत आणि मग निसर्गाच्या सहवासात त्यांना एकांत वासात जे परमसुख मिळे ते त्यांना मोक्षाचा आनंद देत असत. त्यात ते एवढे तल्लीन होत की सारी संसाराची दु:खे विसरत असे. म्हणून तर त्यांनी म्हटले आहे –

**वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती**

**येणे सुख रुचे एकांताचा वास, नाही गुणदोष अंगी येत**

या भूतलावर राहाणाऱ्या प्रत्येक माणसाने आपले पूर्वज असलेली झाडे आणि झाडांच्या असंख्य समूहांची वने यामध्ये काही क्षण घालवून पाहावे. आपोआपच जंगलाची ओढ लागल्याशिवाय राहाणार नाही, एवढे मात्र निश्चित आहे.

# 7 जंगलाचं देणं



गेल्या पन्नास वर्षापूर्वी पाहिलेला निसर्ग मला आजही आठवतो. त्यावेळी वय असेल अंदाजे दोन-तीन वर्षाचे. रानावनात असणाऱ्या एका इवल्याशा गावात वड-पिंपळाच्या सावलीतील ती लहानशी प्राथमिक मराठी शाळा. वडील तेथे शिक्षक होते. घर आणि शाळा पावलाच्या अंतरावरच होती. शाळेत विद्यादानाचे काम सुरु बालविद्यार्थ्यांचे गोड बोल ऐकू यायचे. इकडे घरी आई मला पिंपळाच्या एका आडव्या फांदीला बांधलेल्या दोरीच्या पाळण्यात बसवून झोके द्यायची. झोके देतांना ती काही शब्द गुणगुणायची. तीचे ते बोल ऐकता ऐकता माझे लक्ष पिंपळावर बसलेल्या चिमण्या, साळूंक्या ,बुलबुल, कोकीळ, कावळे इ. पाखरांच्या किलबिलाटाकडे जायचे. अर्धशतकापूर्वीचे ते बोल मला आजही बळ देतात. निसर्गावर प्रेम करण्याचे बाळकडु पाजतात. ते शब्द असे-

**पाखरांची शाळा भरे पिंपळावरती ,चिमण्यांची पोरे कशी गोंगाट करती**

**उतरते उन्ह जाते टळूनी दुपार,पारावर जसा यांचा भरतो बाजार....**

कालांतराने हळूहळू माझे पाय जमिनीला स्पर्शू लागले. तसतसं शरीराला मनाला बळ मिळत गेलं. एखादे वेळी वडिलांसोबत त्यांच्या खांद्यावर बसून बाजाराच्या गावी जायला मिळायचे. गाव ओलांडतांना मोर, लांडोर, कोल्हे, लांडगे आडवे जायचे. एखादेवेळी लांडगे वाटही अडवायचे. अशावेळी वडील एकाच ठिकाणी शांत उभे राहायचे आणि काही वेळातच लांडगा वाट सोडून निघून जायचा. वन्यजीवांसोबत कसे वागावे ? याचा पहिला धडा वडिलांच्या वागणूकीतून मला त्यावेळी शिकायला मिळाला.

त्याच काळात एक दिवस गावात चर्चा पसरली. गावच्या पाटलाने वाघ मारला म्हणून पाटलाची मिरवणूक! वाघ कसा आणि का मारला ? तर ऐकायला मिळाले पाटील गावातील एका मोठया आंब्याच्या झाडाला खाली बकरी बांधून ठेवतो आणि स्वत: त्या झाडावर बंदूक घेवून बसतो. रात्री बकरीच्या आवाजाने, वासाने वाघ येतो आणि पाटील बंदूकीच्या गोळीने वाघाची शिकार करतो. तो वाघ होता की बिबट हे मला अजूनही आठवत नाही. परंतु काही असो तो होता शेवटी मुका जीवच ना ! पाटलाच्या मर्दुमकीची चर्चा आणि मग अख्या गावातून मिरवणूक हा प्रकार चालायचा. एका मुक्या जीवाला झाडाला बांधून ठेवून ते खाण्यास आलेल्या वाघाला बंदूकीने मारावे हा प्रश्न मला त्या बालवयातच सतावत होता. कधीकधी तो माझ्या मनात थैमान घालायचा. मनात वादळ उठवायचा. आणि अशातच वडिलांची बदली झाली. गावातून शहरात आलो अन् आल्या आल्या प्राथमिक शाळेत दाखल झालो.

शालेय विद्यार्थ्यांच्या सहली आजूबाजूच्या वृक्षवनात, एखाद्या बगिच्यात जात होत्या. इतरांबरोबर मीही त्यात आनंदानं सहभागी होत होतो. नव्हे मला अशी निसर्गओढ मुळातच लागली होती. वृक्षलतांवरची पाखरं, सरपटणारे जीव, वानरं, मोर या जीवांचं विश्व मला आवडू लागलं. एक दिवस एका ठिकाणी बाभळीच्या उतरत्या फांदीवर गवताचं पातं पातं आणून घरटं विणणाऱ्या पक्ष्यावर नजर गेली. वेळ मिळेल तसं मी ते पाहात होतो. कुतूहल जागं झालं. घरटं आकाराला येवू लागलं. सहा आठवडयात गारुड्याच्या बिनीसारखं सुंदर घरटं तयार झालं आणि माझ्या मनात जिज्ञासा उत्पन्न झाली. डोक्यावर सोनेरी टोपी असलेला चिमणीएवढा इवलासा पक्षी आणि त्याची कुशल कारागिरी पाहून मी थक्क झालो होतो.

अशाच एका शरद ऋतुत कोजागिरी पोर्णिमेला घडलेली गोष्ट. वय हापपँटातीलच होते. कोजागिरीच्या बाहूल्यांच्या पूजेसाठी ज्वारीचे पाच धांडे आणायचे होते. ज्वारीचे शेतं घरापासून जवळपास तीन-चार किलोमीटर समजून मी एकटाच सांजवेळेपूर्वी निघालो. नाल्याच्या वर चढलो. झुडूपी जंगलात प्रवेशलो. पलीकडे ज्वारीचे शेतात धांडे मिळतील या आशेने पुढे पुढे जात होतो. या गडबडीत सूर्य क्षितिजापल्ल्याड गेला. अंधार पसरु लागला. काही वेळातच दाटू लागला. माझ्या हालचाली वाढू लागल्या. ज्वारीचे शेतही कुठेच नजरेत पडत नव्हते. परतीवर फिरायचं तर रस्ताही सापडत नव्हता. दूरदूरपर्यंत काहीच दिसत नव्हते. सैरावैरा पळत होतो. मनात भिती वाटत होती. एकटाच असल्याने एका विचीत्र परिस्थितीत मी सापडलो होतो. बराच वेळ वाट मिळेल तिकडे पळापळीत गेला.



काही वेळाने डाव्या बाजूने दूरवर तीन-चार दिवे टिपटिमतांना दिसले. त्याचा आधार घेवून त्या दिशेने मी धावत होतो. अखेर घरुन पाच वाजता निघालेला मी रात्री नऊ वाजता रिकाम्या हाताने कसाबसा घरी पोहचलो. आपण का भटकलो ? याचा उलगडा बऱ्याच वर्षानंतर एका शोधकार्यातून झाला. त्याला कारण जंगलाची ओढ.

वीसाव्या वर्षी नोकरीवर लागलो.

रानकोंबडा

वेळ मिळेल तसा जंगल भटकंती, निरीक्षण, वाचन यात जास्त लक्ष घालू लागलो. रानवाचनावर लेखन करुन ते वृत्तपत्रात प्रकाशित होवू लागले.

हळूहळू जवळपासच्या जंगलासोबत केरळमधील मानवाच्या जनूकांशी संबंध असणाऱ्या लाखो वर्षापूर्वीच्या वृक्ष वनस्पती, हत्ती आणि सोळा फुटी किंग कोब्राचे सायलेंट व्हॅली, हत्ती आणि शेकरुचे वायनाड अभयारण्य,जंगल आणि त्यातील वाघासहीत इतर वन्यजीवांचे संरक्षण करणाऱ्या मध्यप्रदेशातील अरण्य, कर्नाटक, महाराष्ट्रातील जंगल इ. जंगलाचे भ्रमण होवू लागले. मात्र घराजवळच्या अवघ्या पन्नास-साठ किलोमीटर असलेल्या मेळघाट जंगलाने खरी माहेरओढ लावली. मेळघाटमध्ये एका वन्यजीव प्रगणनेत अस्वलीने दिलेले जीवदान अजुनही आठवते. तसेच भर उन्हाळयात पाणवठयातून निघालेल्या जंगलचा राजा असलेल्या वाघाचे दर्शन अद्यापही स्मरणात आहे. अरण्यातील वृक्षलता, जैविक विविधता, वन्यजीव, पक्षी. इ.सजीवसृष्टीच्या रहस्यमय जीवनाविषयी निरीक्षणं अभ्यास, ग्रंथ, पुस्तकं वाचनाचा जणू सपाटा लागला. जंगल आणि त्यातील सजीवसृष्टी का नष्ट होत चालली आणि त्याचे रक्षण आणि संवर्धन करणे किती आवश्यक आहे याविषयी लेखनातून, व्याख्यानातून जनजागृती करु लागलो. “वाघ” हा अरण्यातील वन्यजीवांच्या अन्न साखळीतील प्रमुख स्थानी असल्याने वाघाचे जंगलासाठी आणि समृध्द पर्यावरणासाठी असणे किती आवश्यक आहे, हे पटवून देवू लागलो.

मानवाच्या अफाट लोकसंख्येमुळे जंगलाचा –हास करुन माणसासाठी सिमेंट काँग्रीटची जंगलं उभारणे,विकासासाठी उभे होणारे उद्योगधंदे, वाहने इ.मुळे होणारे प्रदुषण आणि वाघाच्या शिकारी यामुळे राज्यातील, देशातीलच नव्हेतर पृथ्वीतलावरील जंगलं ओरबाडली जावू लागली. परिणामी पर्यावरण असंतुलन निर्माण होवू लागले. ते केवळ जंगल आणि त्यातील वन्यजीवांच्या संरक्षणामुळेच. ते कसे टिकू शकेल यावर लिहिता झालो. वृत्तपत्रातील अरण्य लेखनाबरोबर हळूहळू स्वत:ची पुस्तकंही प्रकाशित होत गेली.

पाखर पाहाटे कोवळं उन घेतांना मोर



“ वाघ ” आहे म्हणून जंगल आहे. जंगल आहे म्हणून वाघ आहे. आणि या दोघांमुळे पाऊस, वारा, जमिनीची धूप कमी होणे, मानवासहीत संबंध सजीवसृष्टीला मोफत मिळणारा ऑक्सीजन, आयुर्वेदीय वनस्पती किती किती प्रकारचे फायदे या जंगलामुळे आणि त्यातील वन्यजीवसृष्टीमुळे होतात. एवढच नव्हेतर निसर्गावर प्रेम केल्याने क्रोध, मत्सर, स्वार्थ नाहिसे होतात आणि हळूहळू विश्वकल्याणाचा ध्यास लागतो. एवढी शक्ती या वृक्षराजीमध्ये आणि अरण्यामध्ये, अभयारण्यामध्ये आहे. मात्र त्यावर मनापासून प्रम करणे आवश्यक आहे.

माझ्या मते कित्येक अवयव मिळून माणसाचं एक शरीर निर्माण झालं. समजा शरीर म्हणजे एक पर्यावरण संस्था आहे. एखादा अवयव किंवा घटक कमीजास्त कमजोर झाला तर त्याचा परिणाम संबंध शरीरावर होतो. मग आपण त्यावर डॉक्टरी इलाज करतो. एखाद्या जंगलाचंही असचं असतं. एखादी वृक्षवर्गीय प्रजाती, एखादी वन्यजीव प्रजाती नाहीसी झाली तर त्या जंगलाच्या अन्नसाखळीवर परिणाम होतो. असंतुलन निर्माण होतं. एखाद्या जंगलातील एक वाघ जरी संपला तर अरण्याचे संतुलन बिघडते. त्यावर आधारित इतर वन्यजीवांची संख्या वाढते. वाघ नसलेली जंगलं नष्ट करायला माणूस मागेपुढे पहात नाही. सबंध सजीवसृष्टीस सांभाळणाऱ्या पृथ्वीचही तसच आहे. पाणी, प्रकाश, जमीन, जंगल, हवा यापैकी एखादा घटक जरी कमीजास्त झाला तर पर्यावरणाचं संतुलन बिघडते. सजीवसृष्टीवर त्याचे परिणाम होतात. ऋतुचक्रही मागे-पुढे व्हायला लागतात. अलीकडे दोन वर्षापासून उन्हाळयात पावसाळा की पावसाळयात उन्हाळा याची प्रचीती आली. कधी कधी एका आठवडयात तीन ऋतूंचे येणे-जाणे आपण अनुभवत आहोतच. माणूस

त्याला “ निसर्गाचा बदल ” हे नाव देवून मोकळा होतो. परंतु या सर्व प्रकाराला कारणीभूत हा केवळ “मानव” आहे हे अजूनही पाहिजे तेवढं आपल्या लक्षात आलं नाही. नैसर्गिक साधन-संपत्तीचे अनिर्बंध दोहण, प्रदुषण, जंगलांचा – हास, वन्यजीवांच्या शिकारी इ. मुळे हे सर्व असंतुलन वाढत आहे. त्यामुळे पर्यावरणाचा समतोलही बिघडत आहे. मानव हा सुध्दा या निसर्गाचा एक घटक आहे हे आपणास कधी कळणार ? की केवळ दरवर्षी 5 जून हा दिवस आला म्हणजे “जागतिक पर्यावरण दिन” साजरा करायचा ? याकरिता जंगलाची माहेरओढ लावावी.

प्राणी, पक्षी हे सतत जंगलं वाढवत असतात. प्राणी झाडांच्या खाल्लेल्या फळांच्या बिया आपल्या विष्ठेतून अरण्यभूमिवर टाकतात. पक्षीही फळांच्या बिया आपल्या विष्ठेतून दूरदूरपर्यंत टाकतात. जमिनीत त्या रुजतात. पाऊस पडला म्हणजे त्या अंकुरतात. वाढतात. आणि हळूहळू त्या इवल्याशा रोपांच्या वृक्षलता तयार होतात. त्यामुळं जंगलं वाढतात. पशुपक्ष्यांना निवाऱ्यासाठी जागा मिळतात. पोटासाठी अन्न मिळते. आपली कुळं वाढविण्यासाठी जागा मिळते. यामुळेच पशुपक्षी, वन्यप्राणी पर्यावरणाचं संतुलन साधत असतात. माणूस मात्र या जंगलांवर सतत कु-हाड चालवत असतो.



जंगलाचा राजा वाघ

म्हणून वन आणि वन्यजीवांचे रक्षण करणे, त्यावर प्रेम करणे आवश्यक आहे. नव्हे ती काळाची गरज आहे. ही जंगलं आणि या निसर्गातच विश्वाचं अनंत रुप पाहायला मिळते. मी ते सतत अनुभवत असतो. आणि म्हणूनच संत तुकाराम यांनी सांगितले आहे –

**आधी बीज ऐकले,**

**बीज अंकुरले रोप वाढले,**

**एका बीजापोटी तरु कोटी कोटी,**

**जन्म घेता सुमने फळे**

**व्यापूनी जगता तुही अनंत,**

**बहुविश्व रुपे घेसी घेसी**

**परि अंती ब्रम्ह ऐकले ||**

***

# 8 ‘व्याघ्र संवर्धन की व्याघ्र पर्यटन?’



## ‘व्याघ्र संवर्धन की व्याघ्र पर्यटन?’

व्याघ्र पर्यटनाच्या बाबतीत महाराष्ट्रात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाने तर देशाचेच नव्हे तर साऱ्या जगाचे लक्ष वेधले आहे. येथे जास्त प्रमाणात फुललेल्या पर्यटनावरुन हे सहज लक्षात येते. गेल्या जवळपास पाच-सात वर्षापासून तर कित्येक वेळा ताडोबा-अंधारीमध्ये एकाच वेळी वाघाला पाहाणाऱ्यांची आणि आपआपल्या कॅमेरात कैद करण्याची झुंबड पाहता, हे सहज लक्षात येते. यातून मात्र जंगलाचा राजा असलेल्या वाघाची स्थिती पाहून काहिशी किव आल्याशिवाय राहात नाही.

येथे पर्यटनाकरिता येणाऱ्या बहुतांशी पर्यटकाला भरपूर प्रमाणात व्याघ्र दर्शन झाल्याने तो अती उत्साहीत होतो. सुखावून जातो. शंभर-दिडशे फुटापासून ते अवघ्या आठ-दहा फुटापर्यंत वाघ दिसून येतो. तर काही वेळा तर पर्यटकांच्या जिप्सीला खेटून जाणारे वाघही येथे दिसून येत असल्यामुळे ते माणसाळले की काय? अशी शंकाही मनाला चाटून जाते. एक प्रकारे क्षणभर ही बाब व्याघ्र राजाला माणसाने बंदिस्त केल्यासारखी वाटत नाही काय?

ताडोबा-अंधारी प्रकल्पात एकूण ८६ वाघ आहेत. वाघाच्या अस्तित्वाच्या घनतेनुसार एका नर वाघाला जवळपास तीस ते चाळीस चौरस किलोमीटर एवढे वनक्षेत्र पाहिजे असतांना या प्रकल्पात वाघांच्या अस्तित्वाची घनता १०० चौरस किलोमीटरमध्ये ५.८२ वाघ एवढी झाली आहे. म्हणजेच ताडोबा-अंधारी प्रकल्पात आवश्यकते पेक्षा वाघांची संख्या वाढत चालली असून ही बाब जंगलाच्या आणि पर्यावरणाच्या संतुलनाकरिता अपचनासारखी वाटत आहे. तेवढीच ते दूरगामी परिणाम करणारीही आहे. कारण, हळूहळू याचे दुष्परिणामही जाणवू लागले आहेत.

आवश्यकते पेक्षा जास्त वाघ झाल्याने पर्यटकांना जास्त व्याघ्र दर्शनाची पर्वणी आणि पर्यटनाचा धंदा जरी वाढत चालला तरी ही बाब वाघांच्या नैसर्गिक प्रक्रियेला घातकही ठरु शकते. आणि म्हणून अधिवासाकरिता दोन वाघांमध्ये भांडण होवून एकाचा मृत्यू होण्याचे प्रकारसुध्दा दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच दोन वाघांच्या भांडणातील जखमी झालेला आणि हरलेला वाघ शिकार करण्यायोग्य न राहिल्यामुळे प्रकल्पातून बाहेरच्या वनक्षेत्रात किंवा वनक्षेत्रातील माणसांच्या गावालगत जावून गुरे-ढोरे किंवा माणसावरही हल्ले करतांना आढळून येत आहेत. वाघ-अस्वलाच्या हल्ल्यातून मग मानव आणि वन्यप्राणी संघर्ष वाढल्याचे प्रकारही चंद्रपूर जिल्हयात वाढत चालले आहे, भविष्यात ते अधिक भयावह होवू शकते. कारण गेल्या ऑक्टोंबरमध्ये वरोरा भागातील एका तीन साडेतीन वर्षे वयाच्या वाघीणीच्या नरपिल्लाची आईपासून ताटातुट होवून भटकल्याने वर्धा, अमरावती जिल्हयात प्रवेश करुन दोन माणसांचे आणि सहा

गुरा-ढोरांचे बळी घेवून मोर्शी मार्गे मध्यप्रदेशात निघून जाणे ही बाब चिंता करायला लावणारी आहे, हे नाकारुन चालणार नाही. पांढरकवडातील तेरा माणसांचे बळी घेणारी नरभक्षक अवनी हाही असाच प्रकार होता.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांना मुबलक प्रमाणात उपलब्ध असलेले खाद्य म्हणजेच इतर तृणवर्गीय प्राणी यांची संख्याही येथे भरपूर प्रमाणात असावी. त्यामुळे वाघांना पोट भरण्यासाठी फारसे कष्ट घ्यावे लागत नसावे. याच कारणाने येथील वाघांची प्रजनन क्षमताही वाढली आहे. पर्यटकांना एकाच वेळी एक वाघीण चार ते पाच पिल्लांना जन्म देवून त्यांचा सांभाळ करतांनाही येथे दिसून येते. एवढेच नव्हे गेल्या जून महिन्यात माझा एक सुनिल देशमुख हा निसर्गसखा ताडोबाला सफारीवर गेला असता त्याला सफारीत तब्बल ११ वाघांचे दर्शन झाले. येथील व्यवस्थापनाकरिता ही बाब भूषणावह जरी असली तरी अस्तित्वात असलेल्या वनक्षेत्रावरही हळूहळू त्यांचा ताण वाढवणारी ठरु शकते.

क्षमतेपेक्षा वाघांनी जास्त फुगलेल्या ताडोबा-अंधारीतील वाघांमुळे पर्यटकांना कधीकधी एकाच दिवशी अकरा वाघांचे दर्शन होणे, पर्यटकांनी गच्च भरलेल्या अनेक जिप्स्यांनी मिळून वाघाला घेरणे, वाघाने गाडी जवळ येवून गाडीला स्पर्श करणे म्हणजे दिवस-रात्र व्याघ्र पर्यटनाचा उद्योग जोमात फुलणे होय. मात्र यामुळे वाघांच्या नैसर्गिक सवयीत बदल होवू शकते. हीसुध्दा गंभीर बाब आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे गेल्या नोव्हेंबरच्या दुसऱ्या

आठवड्यात दोन जिप्सीचालकांनी मध्ये असलेल्या वाघापासून अंतर कमी करत गेल्याने वाघ गोंधळला व पुढच्या जिप्सीमागे धावू लागला. हे कशाचे लक्षण आहे? ‘व्याघ्र संवर्धन महत्वाचे की व्याघ्र पर्यटन?’

येत्या २०७० पर्यंत पृथ्वीवरील बंगाल टायगर्स ही अत्यंत आकर्षक असलेली वाघाची प्रजात नष्ट होईल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. ही त्याचीच तर नांदी नाही ना ? जंगलाचा राजा वाघाचे अरण्यरुदन यापासून आपण काही बोध घेणार काय? जंगलाबाहेर पडून वाघ-अस्वलाचे माणसांवर होणारे हल्ले, रस्ते ओलांडतांना त्यांचे होणारे अपघात, शिकारी इ.तून काही धडे घेणार की नाही? येथील वाघांचे स्थलांतर वाघ कमी असलेल्या जंगलामध्ये करावे की नाही आणि ते केले तर यशस्वी होईल की नाही याबाबतचे वन्यजीव तज्ञांचे आणि अभ्यासकांचे सकारात्मक आणि नकारात्मक अशी दोन वेगवेगळी मते आहेत. मात्र वाघांच्या जास्त वाढलेल्या संख्येमुळे चालू दशकात चंद्रपूर सोबत संपूर्ण विदर्भात मानव-वन्यजीव संघर्ष पसरु लागला आहे, यावर विचार करुन कृती करण्याची ही वेळ आहे. ‘व्याघ्र पर्यटन की व्याघ्र सवंर्धन?’ यापैकी कशाची निवड करायची हे शेवटी व्याघ्र प्रकल्प आणि पर्यटक यांनाच ठरवायचे आहे. कारण एकदा पैसे मोजले की वाघ मनसोक्त पाहून घ्यावा आणि त्याच्याबद्दलचे कुतूहल संपून जावे, असा जीव नक्कीच नाही.



आज भारतात १०५ राष्ट्रीय उद्याने, ५० व्याघ्र प्रकल्प तर ७०० च्या वर अभयारण्य आहेत. यापैकी महाराष्ट्राचा विचार केला तर पेंच, ताडोबा, सह्यान्द्री, बोर, नवेगाव बांध, चांदोली व संजय गांधी अशी सहा राष्ट्रीय उद्याने आहेत. राज्यात सहा व्याघ्र प्रकल्प व ५० अभयारण्य व ४ संवर्धन राखीव क्षेत्रे आहेत. या सर्व प्रकल्पात कमी जास्त प्रमाणात व्याघ्र पर्यटन सुरु आहे. गेल्या २०१८ या वर्षात देशात ९९ वाघ आणि ४७३ बिबटयांचा मृत्यू झाला. त्यापैकी महाराष्ट्रात एकूण २० वाघांचा मृत्यू झाला असून देशात वाघांच्या मृत्यूमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे. यापैकी चंदपूर जिल्हयात मानव-वन्यजीव संघर्षात २०१८ या वर्षात २७ जणांचा बळी गेला. २०१७ मध्ये एकट्या चंद्रपूर जिल्हयात ६ वाघांचा मृत्यू झाला असून ताडोबा-अंधारी प्रकल्पात ३ वाघ मृत्यूमुखी पडले आहेत. तसेच जवळपास पंधरा दिवसातून एकदा तरी रस्ता ओलांडतांना बिबट, अस्वल, सांबर, चितळ, रानडुक्कर इ. वन्यजीवही वाहनांच्या अपघातात मरण पावत असल्याचेही प्रमाण वाढलेले आहे.

केंद्रीय वन्यजीव गुन्हे नियंत्रण शाखेने दिलेल्या माहितीनुसार देशात महिन्याला तीन वाघांचा बळी जात असून गेल्या दहा वर्षात ३८४ वाघांची शिकार करण्यात आली. ही बाब वाघांच्या संरक्षण आणि संवर्धन मोहीमेवर चिंता निर्माण करणारी आहे. गेल्या २२ महिन्यात ३३ वाघांचा बळी गेला असून त्यापैकी २२ मृत्यू हे नैसर्गिक, एक मृत्यू अपघाती तर दहा वाघांची शिकार झाली आहे. यात सात वाघ व तीन वाघीणींचा समावेश आहे. अगदी अलीकडे म्हणजे १५ नोव्हेंबरला चंद्रपूर भागात चिचपल्लीच्या जंगलात रेल्वेच्या धडकेत वाघाच्या तीन बछडयांचा मृत्यू झाला

असून डिसेंबरच्या सुरुवातीला ताडोबा बफर झोनमध्ये भामढेळी गावालगतच्या शेतात विजेच्या तारेच्या धक्याने आणखी एका वाघाचा बळी घेतला आहे. हे असेच चालू राहाणार काय?

येत्या २०७० सालापर्यंत पृथ्वीवरुन बंगाल टायगर्स ही अत्यंत आकर्षक वाघांची प्रजात नष्ट होईल, असा अंदाज शास्त्रज्ञांनी व्यक्त केला आहे. या अद्भूत जीवाचे प्रमुख आश्रयस्थान असलेले सुंदरबन धोक्यात आले आहे. ऑस्ट्रेलियातील जेम्स कूक युनिव्हर्सिटीचे शास्त्रज्ञ बिल लॉरेन्स यांनी सांगितले की, सध्या जगात चार हजार वाघ बाकी राहिले आहेत. काही दशकांपूर्वी मोठ्या प्रमाणात आढळणारा हा देखणा जीव आता केवळ भारत आणि बांगला देशातील नदी खोऱ्यातच आढळू लागला आहे. जलवायू परिवर्तन, सागरी तळ व अन्य घटकांबद्दल संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांना असे आढळून आले की, येत्या ५० वर्षात बंगाल टागर्स पृथ्वीवरुन पूर्णत: नष्ट होतील. नैसर्गिक कारणांबरोबरच सुंदरबनच्या आसपास होत असलेला औद्योगिक विकास आणि अवैध शिकार यामुळे या वाघांचा लुप्त होण्याचा धोका दुप्पट वाढला आहे.

आफ्रिकेतील मॅड हायवर्ड व जिना हायवर्ड यांनी केलेल्या सिंहाविषयीच्या अति पर्यटनामुळे सिंहांच्या मानसिक शारीरिक स्थितीवर काय परिणाम होतो, यावर २००८ साली केलेल्या संशोधनात माणसाच्या सततच्या सहवासामुळे सिंह प्रचंड तणावात असल्याचे आढळून आले. त्यांच्या उभे राहणे व बसण्यापासून तर झोपण्या-उठण्यापर्यंत अशा सर्वच गोष्टीवर प्रतिकूल परिणाम झालेला दिसून आला. त्यांच्या प्रजनन क्षमतेवर आणि छाव्या सोबतच्या त्यांच्या

सहवासावरसुध्दा प्रतिकूल परिणाम झाला. तसेच त्यांची हृदयाची स्पंदने वाढतात, अस्वस्थ होणे, शारीरिक उर्जा कमी झाल्याने चपळपणा नाहिसा होतो. त्यांचे नैसर्गिक जगणे विसरुन गेल्याची नोंद या संशोधनात आहे.

जगात पर्यटन उद्योगाने जवळपास गेल्या दोन दशकांपासून चांगली भरारी घेतली आहे. जसजशी आर्थिक सुबत्ता वाढत चालली तसतसे पर्यटनाचा उद्योग आणि त्याचे स्वरुपही बदलत चालले आहे. अलीकडे तर ऐतिहासिक स्थळांपेक्षा आपल्या देशात जंगलातील व्याघ्र पर्यटनाने पर्यटकांवर जणू मोहिनी घातली आहे. जगभरातही असेच चित्र दिसून येते. गेल्या दहा-बारा वर्षापासून वाघ बघायचा म्हणजे महाराष्ट्रातील एकमेव हमखास ठिकाण ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प. हे नाव सध्या देश आणि विदेशातही चर्चेत आहे. पावसाळ्याचे काही दिवस सोडले तर दिवस-रात्र चालणाऱ्या व्याघ्र पर्यटन व्यवसायाने वन खात्याला सुगीचे दिवस आले आहेत, असे म्हटल्यास वावगे होणार नाही. मात्र अति व्याघ्र पर्यटन ही बाब जेवढी चांगली तेवढीच ती वाघांच्या नैसर्गिक वागणूकीवर वाईट परिणाम करणारी ठरते की काय? अशी शंका येणे स्वाभाविकच आहे. जंगल म्हणजे काय केवळ वाघच आहे? नक्कीच नाही. जंगलातील प्रत्येक सजीव, त्याचे रंगरुप आणि त्यांच्या जीवनाचे रहस्य हे अनाकलनीय असले तरी सततच्या प्रयत्नाने ते साध्य होवू शकते. आणि मग एखाद्या जीवाचा अभ्यास करता करता जीवनही अपूरं वाटू लागतं.

. . . . .

# 9 मानव-वन्यजीव संघर्ष



# मानव-वन्यजीव संघर्ष

जवळपास दोन महिन्यांपूर्वी चंद्रपूरच्या वरोरा औष्णिक विद्युत प्रकल्प परिसरातून एका वाघीणीच्या पिल्लाची आपल्या कुटूंबापासून ताटातूट झाली. तज्ञांच्या मतानुसार हा वाघ जास्तीत जास्त तीन वर्षाचा असावा. त्यानंतर तो भरकटला व त्याची स्थलांतरास सुरुवात झाली. नंतर तो वर्धा व त्यानंतर अमरावती जिल्हयाच्या धामणगाव तालूक्यात पोहचला. ताटातूट झाल्याने व नवीन जंगलामुळे तो अधिक बिथरला असावा. मग प्रवासा दरम्यान भूक लागल्यावर हा वाघ गुराढोरांवर हल्ला करु लागला. त्यानंतर १९ ऑक्टोबर रात्री मंगरुळ दस्तगीर येथे या वाघाने एका गावकऱ्यावर हल्ला करुन त्याला ठार केले. त्यानंतर अवघ्या तीन दिवसात २२ ऑक्टोंबरला रात्री अंजनसिंगी येथे परत एका गावकऱ्याला ठार केले. यानंतर तो पुढे तिवसा भागात रघुनाथपूर आणि २६ ऑक्टोबर रोजी तो तळेगांव ठाकूर, नेरपिंगळाई, पिंपळखुटा, मोर्शी आणि अखेर मध्यप्रदेशातील बैतुल जिल्हयात तो पोहचला.

दरम्यान गुरा-ढोरांनाही त्याने ठार केले. आतापर्यंत जवळपास ३५० किलोमीटर एवढी या वाघाची भटकंती झाली आहे. वन विभागातर्फे दिवस-रात्र त्याला बेशुध्द करुन पकडण्याचे प्रयत्न जोमात झाले. परंतु त्यात त्यांना यश आले नाही.

मुळात माणूस हे काही वाघाचे नैसर्गिक खाद्य नाही. वय पूर्ण होण्यापूर्वीच काही कारणामुळे आईपासून होणारी ताटातुट, दोन वाघाचे अधिवासाच्या हक्काकरिता होणारे भांडण किंवा वाघीणीकरिता झालेली लढाई आणि त्यातून जखमी व पराभूत होणारे वाघ त्या परिसरातून निघून जातात.



जखमी अवस्थेमुळे त्यांना शिकारही करता येत नाही आणि मग गावाजवळच्या जंगल परिसर, शेतीमध्ये जावून दिसेल त्यावर हल्ला करत सुटतो. यात माणसावरही हल्ल्याचे प्रमाण वाढते आणि मग अशा वाघाला नरभक्षक असे म्हटल्या जाते. मानव आणि वन्यजीव संघर्ष हा मुद्दा अतिशय संवेदनशिल आणि गंभीर आहे. पण याचं मुळसुध्दा लोकसंख्येची झपाट्याने होणारी वाढ आणि त्यांच्या निवासाकरिता जंगलाचे चाललेले अतोनात दोहन हा आहे. तसेच विदर्भातील ताडोबा-अंधारी प्रकल्पात क्षमतेपेक्षा जास्त झालेली संख्या विविध कारणांमुळे त्याचे विपरित परिणाम सध्या चंद्रपूर जिल्हयात चालू आहेत. परंतु आता त्याचे लोण पश्चिम विदर्भात अमरावती जिल्हयापर्यंत पोहचणे ही बाब विचार करायला लावणारी आहे. अन्यथा कालांतराने मानवी वस्त्यांमध्ये भरकटलेला वाघ असो वा नरभक्षक वाघ असो हे प्रकार यापुढे नित्याचेच होवू शकेल. पांढरकवडा परिसरात गेल्या दोन वर्षात एका नरभक्षक टी वन नावाच्या नरभक्षक वाघिणीने तेरा गावकऱ्यांना आतापर्यंत ठार केले आहे. गेल्या नऊ महिन्यापासून वाघाला गोळया घालून ठार मारण्याची मोहीम राबिविली जात आहे. शेवटी नोव्हेंबरच्या अगदी सुरुवातीला या वाघीणीला गोळया घालून ठार मारण्यात आले आणि आणखी एक वाघ कमी झाला. त्यानंतर चंद्रपूर भागातच वाघाचे तीन पिल्लं रेल्वेमुळे संपले. शेवटी पृथ्वीचं अस्तित्व पर्यावरण संतुलनावरच अवलंबून आहे. त्याकरिता माणूस हा वाचलाच पाहिजे आणि वन्यजीवांचही संरक्षण झालंच पाहिजे. कारण या भूतलावरचा प्रत्येक जीव हा सारखाच महत्वाचा आहे. मात्र माणूस हा बुध्दीवान असल्याने तोच हे संतुलन साधू शकतो.


वाघाचा पाऊलठसा

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आवश्यकते पेक्षा जास्त वाघ झाल्याने पर्यटकांना जास्त व्याघ्र दर्शनाची पर्वणी आणि पर्यटनाचा धंदा जरी वाढत चालला तरी ही बाब वाघांच्या नैसर्गिक प्रक्रियेला घातकही ठरु शकते. आणि म्हणून अधिवासाकरिता दोन वाघांमध्ये भांडण होवून एकाचा मृत्यू होण्याचे प्रकारसुध्दा दिवसेंदिवस वाढत आहेत. तसेच दोन वाघांच्या भांडणातील जखमी झालेला आणि हरलेला वाघ शिकार करण्यायोग्य न राहिल्यामुळे प्रकल्पातून बाहेरच्या वनक्षेत्रात किंवा वनक्षेत्रातील माणसांच्या गावालगत जावून गुरे-ढोरे किंवा माणसावरही हल्ले करतांना आढळून येत आहेत. यातून मग गेल्या चार-पाच वर्षापासून मानव आणि वन्यप्राणी संघर्ष वाढल्याचे प्रकारही चंद्रपूर जिल्हयात वाढत चालले आहे, हे लोण आता यवतमाळ, पांढरकवडा आणि आता अमरावती जिल्हयापर्यंत पर्यंत येवून पोहचले आहे.

परंतु काही मंडळींना या लहानशा वाघालाही नरभक्षक असे चुकीने संबोधल्या जायची घाई झाल्यासारखे वाटते. वरोरा भागातून आपल्या आईपासून ताटातूट झाल्यानंतर ऑक्टोबरमध्ये अमरावती जिल्हयात धुमाकुळ घालणाऱ्या अवघ्या तीन वर्षाच्या वाघाच्या पिल्लाने कदाचित आपल्या आईकडून अद्याप शिकारीचे पूर्ण धडेही घेतले नसावे. त्यात नवनवीन जंगल परिसर आणि तेही ऐकटेपणात. यामुळे हा वाघ जास्त गोंधळून गेला. आणि मग भटकंती दरम्यान भूक शमवण्यासाठी गावकरी आणि गुरांवर हल्ला करु लागला. यात दोन गावकरी आणि सहा गुरांना त्याने हलूला करुन ठार मारले. वन विभागाने त्याला युध्द स्तरावर पकडण्यासाठी विविध हालचाली सुरु केल्या. परंतु त्यात यश आले नाही. नशीब या वाघाला ठार मारण्याचे आदेश निघाले नाहीत. परत एक वाघ कमी झाला असता. मात्र चंदपूर

जिल्हयातील मानव-वन्यजीव संघर्ष आता पश्चिम विदर्भापर्यंत का येवून पोहचला याचा गांर्भियाने विचार करण्याची वेळ आली आहे. शेवटी तो मोर्शी तालुक्यातून मध्यप्रदेशमध्ये निघून गेला. नाहीतर पांढरकवडा परिसरात धूमाकुळ घालून तेरा माणसांवर हल्ले करणाऱ्या नरभक्षक वाघिणीसारखे या लहानशा वाघालासुध्दा नरभक्षक समजून गोळ्या घालण्यात आल्या असते. मात्र या प्रकरणामुळे चंद्रपूर जिल्हयात गेल्या चार-पाच वर्षापासून गंभीर झालेला मानव-वन्यजीव संघर्ष थेट अमरावती जिल्हयापर्यंत पोहचला आहे, ही गंभीरपणे विचार करायला लावणारी बाब आहे. पर्यावरण असंतुलन हेच याच कारणीभूत आहे. एक वाघ नष्ट करणे म्हणजे एक निबीड अरण्य संपणे होय.

अरण्यातील अन्नसाखळीत वाघ हा सर्वोच्च स्थानी आहे. ते जर असेच संपत गेले तर जंगलाचा असमतोल बिघडेल आणि परिणामी त्याचे परिणाम मानवावरही होवू शकतील. निसर्गाला माणसाची आवश्यकता नसून मानवालाच निसर्गाची गरज आहे. निसर्गाचे नियम बदलत नाहीत. निसर्ग बदलत राहातो. याला कारण मानवी विकासचक्रात जंगलाचा होणारा अतोनात –हास, भयंकर प्रमाणातील प्रदूषण हे आहे.

जंगलाचा राजा वाघाला समृध्द पर्यावरणाचं प्रतिक मानल्या जाते. वाघ आहे म्हणून जंगल आहे आणि जंगल आहे म्हणून पाणी आणि शुध्द ऑक्सीजन आहे. यावरच पृथ्वीतलावरील संबंध सजीवसृष्टीचं भवितव्य अवलंबून आहे. मग याकरिता जंगल, वाघ आणि मानव यांच संतुलन साधून पर्यावरणाचा समतोल साधणे ही काळाची गरज आहे.




मेळघाटी सूर्योदय

पौषाच्या मध्यात मेळघाट सागगारात पावलं पडली. तरीपण थंडीचा जोर हुडहुडी भरवणारा होता. परतवाडा-चिख्लदरा मार्गे दुपारी सेमाडोह येथे पोहचलो. थोडे जेवण घेतले आणि माखला या ऊंच ठिकाणी जायला निघालो. जवळपास 14 किलोमीटरच्या अंतरात उंच उंच पर्वतराजी आणि खोल खोल दऱ्या यातून घाटवळणाने माखला येथे पोहचलो. व्याघ्र प्रकल्पाचे विश्रामगहाकडे दगड-धोंड्याच्या रस्त्याने विश्रामगहासमोरील आंबराईत पावलं पडली तोच राव्यांचा एक थवा एका आम्रवृक्षावर किलबिलाट करत उतरला होता. येथील काही आंब्यांना सध्या मोहर आला आहे. त्याचा मोहर मोहर सुगंध साऱ्या परिसरात दरवळा होता. समोर व्याघ्र प्रकल्पाचे विश्रामगृह आहे. पूर्वी या आमराईत आंब्याची भरपूर झाडं होती. आता अत्यंत कमी आम्रवृक्ष शिल्लक राहिले आहेत. थोडावेळ थांबून मुक्कामाकरिता सेमाडोहकडे परतलो. भल्या पहाटे टकाचोर पक्ष्याच्या कर्कश आवाजाने जाग आली. सिपना नदीच्या तिरावर सेमाडोह हे ब्रिटीशकालीन विश्रामगृह असल्याने थंडीचा जोर जास्तच वाटत होता. येथे साग, आंबा, वड, पिंपळाची मोठमोठी झाडं आहेत. कॅमेरा घेतला व बाहेर पडलो. साग वृक्षाची पानगळ सुरु असल्याने जमिनीवर वाळलेली पाने पसरली होती. नदीच्या पलीकडच्या काठावरील ऊंच ऊंच सागगारातून गरुडाचीही शिळ ऐकू आली. धनेश पक्ष्याची एक जोडी अन्नाच्या शोधात झाडाझाडावरुन भराऱ्या घेत फिरत होती. पूर्वेचं तांबडं हळूवारपणे उधळू लागल्याने उन्हाची किरणं पर्वतावरुन उतरुन ते या परिसरावर पसरु लागलं होतं. सिपनेच्या पात्रातील पाण्यावर हे कोवळं उन्ह नदीला सोनतांबडी चकाकी देत होतं.



धनेश

त्यातील पाण्याचा डोह आणि त्यात काठावरील झाडांचे पडलेले प्रतिबिंब चित्रातील एखाद्या डोळ्याप्रमाणे दिसत होते. तसेही नदीतील डोह हे जंगलाचे डोळे असतात.

मुख्य रस्त्याने विश्रामगहाच्या अगोदर भटकंती करता करता फर्लांगभर अंतरावर दूरवर सागवृक्षाच्या खाली लक्ष गेले. एक जुनाट इंजीन व त्याचे पार्ट पार्ट इतस्तत: पालापाचोळ्यात विखुरलेले दिसत होते. जवळ जावून पाहातो ते ब्रिटीशकालीन गिट्टी क्रशर यंत्र होते. ब्रिटीशांनी जवळपास दिडशे वर्षापूर्वी मेळघाटात सागवृक्षांच्या लाकडाची वाहतूक, दळणवळण व प्रशासकीय सोयीकरिता सर्वप्रथम रस्त्यांचे जाळे विणले. त्याकाळात सातपुडा पर्वताच्या दऱ्याखोऱ्यातून नागमोडी वळणाचे रस्ते तयार करणे एक आव्हान होते. परंतु त्यांची बुध्दीमत्ता, परिश्रम व जिद्द आणि त्यावेळी लंडनहून तयार केलेली यंत्रसामुग्री आणून मेळघाटच्या विकासाची प्रथम पायाभरणी केली. आज घाटवळणाच्या मेळघाटात जे सुरेख रस्ते दिसतात ते यामुळेच शक्य झाले. परंतु या क्रशरची दुर्दशा पाहून मन खिन्न झाले.



हे यंत्र जुळवा जुळव करुन सेमोडोह येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आवारात दर्शनी भागात ठेवल्या गेल्यास समृध्द ब्रिटीश राजवटीच्या कार्याचा सन्मान केल्यासारखे होईल.





सकाळी नाश्ता घेण्यास मुख्य रस्त्यावर व्याघ्र प्रकल्पाच्या निसर्ग पर्यटन संकुलापूर्वीच्या हाटेलवर पोहचलो. पर्यटकांनी भरलेल्या तीन जिप्सी गाड्या नुकत्याच परतल्या होत्या. त्यातील पर्यटकांचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. पुढे संकुलात फेरफटका मारला. बऱ्यापैकी पर्यटकांची गर्दी, संकुलात राहाण्यासाठीच्या देखण्या हटस्, काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची धावपळ तसेच संकुलातील हॉटेलवरही चांगली वर्दळ दिसून आली. मी जवळपास तीन तपापासून मेळघाट भटकत आलो आहे, परंतु पर्यटकांची मांदियाळी मला येथे प्रथमच पाहावयास मिळत होती. हा एक सुखद अनुभव होता.

असेच एक रोड रोलर सेमाडोह पर्यटन संकुलाकडे जातांना सिपना नदीच्या अलीकडे डाव्या हातावर तुकड्या तुकड्यात विखुरले गेलेले आढळून आले. त्याची चाकं व इतर पार्ट अंतरा अंतरावर मातीत मिसळू पाहात आहे. हे रोड रोलर JOHN FOWLER & CO. LEEDS या ब्रिटीश कंपनीचे असून ते 1860 साली इग्लंडमध्ये तयार केले गेले आहे. या दुर्लक्षीत महत्वूपूर्ण यंत्राची जुळवाजुळव करुन तेही सेमाडोह येथे दर्शनी भागात ठेवण्यात आले पाहिजे. जेणेकरुन सेमाडोह येथे येणाऱ्या जाणाऱ्या पर्यटकांचे लक्ष ते वेधून घेईल. सूर्य हातभर वर आला होता. गारवा थोडाफार होताच. सेमाडोहवरुन रायपूर रस्त्याने निघालो. मेळघाटातील हा माझा आवडता जंगल परिसर आहे. सात किलोमीटरवरील पिपलपडाव वनचौकीवर येवून थांबलो. पर्यटकांना आकर्षित करणारी वनचौकी लक्ष वेधून घेणारी आहे.

दोन तरुण वनरक्षक नवरा-बायको हे आपली ड्यूटी चोख बजावत होते. त्यांची चौकशी करु लागलो. हे दोघेही दोन वर्षापूर्वी मेळघाट व्याघ्र प्रकल्पात नोकरीवर लागले आहेत. मेळघाटात बऱ्याच ठिकाणी आता मेळघाटातील आदिवासी तरुणांना वनरक्षक पदावर नोकऱ्या देण्यात आल्या आहेत.

त्यातही तरुण मुलींची संख्या जास्त आहे. याचा फायदा हे तरुण स्थानिक असल्यामुळे आवडीने, तळमळीने जंगल आपलं घर समजून त्याचे रक्षण करतांना दिसतात. ही बाब जंगल रक्षणाच्यादृष्टीने अतिशय चांगली आहे. त्यांचेसोबत पिपलपडावच्या पाणवठ्यावर फेरफटका मारला. पोहचतातक्षणी एका ऊंच साग वृक्षावरुन शेकडो हरियल पक्ष्यांचा थवा आमच्या उपस्थितीने उडून गेला. कदाचित तेही पाणी पिण्यास पाणवठयावर आले असावेत. यापूर्वी मी कित्येक रात्री येथील मचाणवर निरीक्षणाकरिता घालवल्या आहेत. निरीक्षणे केली आहेत. त्यावर लेखन केले आहे. पाणवठ्याच्या काठावर मातीत रानगवे, सांबर इ.च्या पाऊलखूणा दिसल्या. रात्री ते येथे पाणी पिण्यास आले असावे.



शिंगळा

पुढे कुआपाटी वनचौकीवरुन रायपूर येथे पोहचलो. तांबट पक्ष्याचे टोक् टोक् आवाजाने लक्ष वेधले. संजय नावाचा वनमजूर स्वागतास तयार होताच. पूर्वीच्या ओळखीमुळे त्याने आस्थेने रायपूर येथील ब्रिटीशकालीन विश्रामगृह दाखविले. 1892 साली ते बांधण्यात आले आहे. स्वच्छता, रंगरंगोटी यामुळे हे अधिकच देखणे वाटते. येथेही आमचे यापूर्वी बरेच मुक्काम झाले आहे. संजूने केलेला बिन दुधाचा चहा सर्वांनी घेतला व परतीवर निघालो. येतांना कुवापाटी वनचौकीवर थांबलो. एका वनरक्षकाने एका सागवृक्षाच्या ढोलीत घुबड असल्याचे सांगितले. सर्वजण पटापट गाडीतून उतरुन आपआपल्या कॅमेराने त्याचे छायाचित्र घेवू लागले. ते होते शिंगळा SCOP OWL घुबड. हे घुबड आकाराने लहान असून करड्या तपकिरी रंगाचा शरीराचा वरचा भाग ज्यावर पांढऱ्या रेषा व ठिपके असतात. हनुवटी आणि गळा भुरकट रंगाचा. हे पक्षी वनात एकटे किंवा जोडीने राहातात. मनसोक्त छायाचित्रे घेवून परतीवर सेमाडोहकडे निघालो.

दुपारी सेमाडोह येथे जेवण करुन हरिसालवरुन चौराकुंडकडे निघालो. चौराकुंड हे रानपिंगळाचे (Forest Owlet) माहेर. यालाच डूडा असे म्हणतात. जगभरातून पक्षी अभ्यासक येथे त्याच्या निरीक्षण आणि अभ्यासासाठी येत असतात. पूर्वी हा पक्षी जगभरातून नामशेष झाला होता. त्यानंतर तो चौराकुंड वनप्रदेशात आढळून आला. फालतू नावाचा आदिवासी कोरकु वनरक्षक हा या डुडा पक्ष्याचा खरा अभ्यासक. तो त्याचा आवाज काढून डुडा दाखवतो. येथे येणाऱ्या पक्षी अभ्यासकांचा फालतू हा खरा आधार आहे. यावेळी मात्र आमची फालतूची भेट झाली नाही. सूर्य पश्चिमेच्या क्षितीजाकडे चालला होता. काही वेळाने आम्ही माघारी परतलो.



दोन दिवसाच्या मुक्कामानंतर आज परतीच्या प्रवासाचा तिसरा दिवस उजाडला. सर्वांनी सामानाची आवरा सावर करुन बॅगा भरल्या आणि कोलकासकडे निघालो. कोलकास हा भाग मेळघाटच्या हृदयस्थानी आहे. पायथ्याजवळच्या वसंत संकुलात पोहचताच नानाविध पक्ष्यांचा कलरव सुरु होता. कोलकासचे मूळ कोरकू नाव कुलाकासा म्हणजे वाघाची जागा असा होतो. कुला म्हणजे वाघ आणि कासा म्हणजे जागा. सिपना नदीच्या तिरावर कोलकास येथील हे जुने ब्रिटीशकालीन विश्रामगृह आहे. येथे हिरवीगार उंच उंच साग आणि इतर वृक्ष असल्याने आल्हाददायी वातावरण होते. विविध फुलपाखरांची लगबग लक्षवेधक होती. पुढे वरच्या सिपनेच्याच राखी बल्डावरील विश्रामगृहाकडे जातांना हत्ती सफारीकरिता दोन हत्तीवर बसण्याचा पर्यटकांचा उत्साह ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले. हत्तीचा माहूत योग्य ती काळजी घेत पर्यटकांना हत्तीच्या पाठीवर बसून देत होता. लहान मुलांचा आनंद ओसंडून वाहात होता. येथून वरच्या भागात 1972 साली बांधलेले सुसज्जीत विश्रामगृह आहे. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असतांना तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी मेळघाटला भेट दिली होती. त्यावेळी त्यांचा या वरच्या विश्रामगृहावर मुक्काम होता. विश्रामगृहाच्या पुढ्यात उभे राहून नजर फिरवली असता पूर्वेकडून मोठमोठया सागवृक्षांचा विस्तीर्ण वन प्रदेश नजरेत पडतो. त्यातून सिपना नदी इंग्रजी S आकारात वाहात येथील जैवविविधतेला समृध्द करते. विश्रामगृहापासून खाली राखी डोह जवळपास एक हजार फूटावर आहे.



राखी बल्डयावरील कोलकास वन विश्रामगृह

हा डोह बाराही महिने या वनप्रदेशातील वन्यजीवांची तहान भागवतो. कोलकसचा सहवास एखाद्या हिरव्या पाचूच्या बेटावर असल्याचा अनुभव येथे येतो. जणू हा अरण्य प्रदेश भूतलावरील स्वर्ग वाटतो. येथील वृक्षवेली, पशूपक्षी, सिपनेच्या खळाळण्याचा नादमय आवाज येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना भूल पाडते.

पुढे चिखली फाट्यावरुन अकोट मार्गे तारुबांदा विश्रामगृह परिसरात पोहचलो. हे विश्रामगृह टापटिप दिसत असून येथे पर्यटकांसाठी विशेष आकर्षणीय सोयी केल्या आहेत. येथे मुक्कामी पर्यटकांची उपस्थिती दिसून आली. तारुबांदा म्हणजे चारोळीची बंदी. तारोफ म्हणजे चारोळी आणि बांदा म्हणजे बंदी. पूर्वी या भागात अस्वलांची संख्या भरपूर होती. आता चारोळीचे झाडंही अत्यंत कमी झाले आहे. मात्र पर्यटकांचा ओघ सतत असतो. हे विश्रामगृह व्याघ्र प्रकल्पाचे असून ते ब्रिटीशांनी बांधले आहे. मी या भागात जवळपास 21 वर्षापूर्वी व्याघ्र प्रगणनेत सतत आठवडाभर जवळपास शंभर-सव्वाशे किलोमीटर पायी भटकंती केली आहे.

तारुबांदावरुन पुढे जवळपास एक तासाने ढाकणा येथील ब्रिटीशकालीन विश्रामगृह परिसरात पावलं पडली. सुरेख रंगरगोटी केलेले विश्रामगृह आणि पुढयातील पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी तयार केलेले लाकडी मचाण, निरीक्षण मनोरा, वड-पिंपळाच्या भव्य वृक्षाखालील पाळणा इ. सोयी पर्यटकांना आकर्षित करतात. विश्रामगृहाच्या पुढयातून गडगा नदी वाहाते. काळ्याशार कातळांवरुन वाहाणाऱ्या गडगेने येथील जैवविविधतेला समृध्द केले आहे. येथील निसर्गसौंदर्य प्रत्येक पर्यटकास भूल पाडल्या शिवाय राहात नाही. मेळघाटात त्यावेळी ब्रिटीशांनी बांधलेले प्रत्येक

विश्रामगृह आणि त्या परिसराची निवड नक्कीच वाखाणण्याजोगी आहे. आणि महत्वपूर्ण बाब म्हणजे मेळघाटात जवळपास दिडशे वर्षापूर्वी प्रथम जे रस्त्यांचे जाळे विणले ते बांधत असतांन ब्रिटीश अधिकाऱ्यांसाठी मुक्कामासाठी या विश्रामगृहांची निर्मिती त्यांनी केली. सुरुवातीला हे विश्रामगृह गवताच्या छताचे होते. त्यानंतर हळूहळू त्यात बदल होत गेला.

रायपूर वन विश्रामगृह



तीन दिवसाच्या आमच्या ग्रीन सर्कलच्या सहा जणांच्या चमूच्या या भटकंतीती बेलकुंड हे शेवटचे ठिकाण. मेळघाटातील मुक्कामाचे आमचे हे सर्वात आवडीचे ठिकाण. 1891 साली ब्रिटीशांनी हे विश्रामगृह बांधले आहे. बेल नाला विश्रामगृहाच्या बाजूने वाहातो. पूर्वी येथे बेलाचे भपूर झाडं होती. पूर्वी हे विश्रामगृह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यात होते. ते व्याघ्र प्रकल्पाच्या ताब्यात यावे हे प्रकरण न्यायालयात चालले आणि अखेर जवळपास दहा वर्षाच्या न्यायालयीन लढाईनंतर ते मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या ताब्यात आले. मात्र या न्यायालयीन लढाईत बेलकुंड विश्रामगृहाची वाट लागली होती. आम्ही मेळघाटच्या कित्येत भटकंतीत ते पाहात होतो. खिडक्या, दरवाजे, लोखंडी ग्रील चोरी गेले होते. आता अलीकडे व्याघ्र प्रकल्पाने ते सुसज्जीत केले असल्याचे ऐकले असल्यामुळे आम्ही उत्साहाने तेथे पोहचलो. परंतु तारेचे कुंपण आणि कुलूपबंद फाटक यामुळे अखेर बेलकुंड विश्रागृहाचे दर्शन झालेच नाही. तरुण वनरक्षकास विनंती करुन त्याने फाटक उघडण्यास असमर्थता दाखविली. त्याने आपली जबाबदारी चोख पाळली. जेथे माझे व आमच्या चमूचे अनेक मुक्काम झाले, येथील मुक्कामावर लेखन झाले. ते न पाहाता परतावे लागले याचे शल्य मनाला बोचत आहे. आता मात्र बेलकुंडच्या आठवणी तेवढ्या स्मरणात ठेवणे भाग आहे.

सजीव सृष्टीने समृध्द असलेले मेळघाट आता पर्यटकांनी फुलत चालले आहे. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी आणि रस्त्याने पर्यटकांची गर्दी वाढू लागली आहे. पर्य्रटनावर आधारित लहान सहान उद्योगामुळे रोजगारही स्थानिक लोकांना उपलब्ध झाला आहे. चिखलदरा, आमझरी, सेमाडोह, कोलकास, हरिसाल, शहानूर, ढाकणा, तारुबांदा,

रंगूबेली, चौराकुंड, रायपूर इ. विश्रामगृहाने कात टाकली असून पर्यटकांची मांदियाळी दिसून येत आहे. येथील दऱ्याखोऱ्याच्या भौगोलिंक परिस्थितीमुळे वाघ जरी लवकर दिसत नसला तरी इतर समृध्द जैविक विविधता परत परत मेळघाटात यायला खुणावत असते. जंगलाचं देणं हे नेहमी भरभरुन देणारं असतं.



कोलकास विश्रामगृहावरुन दिसणारी सिपना नदी

# 11 मेळघाटी “होळीरंग”

डोंगरदऱ्यात राहाणाऱ्या आदिवासींचा कल्पवृक्ष मोहफुलांचा मोयान, मोयान सुगंध तर आंब्याच्या मोहरानं सारा परिसर मोहरलेला असतो. मागील वर्षी शिशिराच्या पडझडीत आणि ऋतुराज वसंताच्या आगमनाबरोबरच माझी पावलं सातपुडयातील मेळघाटात पडली होती. होळीचा दिवस होता. सृष्टीवर सूर्यकिरणाचं कोवळं रुप पसरलं होतं. हरसिलच्या पश्चिमेकडेचं पाच-सहा किलोमीटरवरचं “बोरी” गाव. काही ठिकाणी सिपनेचं पात्र काहीसं सुकलं असलं तरी थोडा फार प्रवाह सुरु होता. खंडया, कोतवाल, पंकोळी इ.पक्षांच्या भराऱ्या लक्ष वेधत होत्या.



पुढे “खापरा” नदीचे पात्र पार करुन सातपुडयातील एका डोंगरपायथ्याच्या बोरी या इवलशा गावात प्रवेशलो. गावाची लोकसंख्या असावी अंदाजे दोन हजार. एका ठिकाणी आदिवासी तरुणांचा समूह कुठल्यातरी कार्यात गुंतला होता. जवळ जावून पाहातो तो होळीची उभारणी सुरु होती. अंदाजे चार फुटाच्या अंतरावर दोन होळया पुर्णत्वास आल्या होत्या. दोन होळयांबाबत चौकशी केली असता एक आदिवासी “पुरुष” तर दुसरी आदिवासी “स्त्री” ची प्रतिकात्मक होळी असल्याचे कळले. दोन होळयांच्यामध्ये आदिवासींच्या घरात असलेल्या पाळणासारखा पाळणा बांधला होता. त्याला मधोमध बाळाला झोपवावयाचे पोतेही गुंडाळले होते.

जमिनीवर साधारणत: चार-पाच फुट व्यासाच्या आकारात आणि पंधरा-वीस फुट उंच असलेल्या होळीची रचना उत्कृष्ट स्थापत्यशास्त्रानुसार केली गेली होती. शंखासारखी तीची रचना असून वर निमूळती होत गेली होती. आजूबाजूला सागवानाची उंच गोलाकार असलेली लाकडं उभी केली असून मध्यभागातून दोन उंच जाड बांबू उभे रचलेले होते. टेंभूर्णीची डहाळी हा होळीतील एक प्रमुख घटक असतो. पळसाची फुलं म्हणजे केसा, डहाळया, पुऱ्या,चपाती आदी सामग्री बांधली होती. यालाच होळीचा शृंगार मानला जातो. स्त्रीच्या होळीत त्या बांबूवर हिरव्या पानांच्या लहान-लहान डहाळया बांधल्या होत्या. वरच्या भागात सुप, टोपली हया आदिवासी स्त्रीच्या संसारात महत्वाच्या असलेल्या वस्तू लटकवल्या होत्या. तर पुरुष होळीत बांबूला मध्यभागी बांबूच्या सालीव्दारे कुशल



कारागिरीतून तयार केलेली डोक्यावर बांधावयाची "पगडी" बांधली होती. आदिवासींच्या वेशभूषेत डोक्यावरील पगडीला महत्वाचे स्थान आहे. यालाच आदिवासी "बडी होली" असे संबोधतात.

होळीची रचना शंकूसारखा असण्याचे शास्त्र शंकूसारखा आकार हे इच्छाशक्तीचे प्रतीक आहे. या आकारात घनीभूत होणारे अग्नीस्वरुपी तेजतत्व भूमंडलावर आच्छादीत झाल्याने तिचा भूमीला लाभ मिळण्यास

साहाय्य होते आणि पाताळातून भूगर्भाच्या दिशेने प्रसारीत होणाऱ्या त्रासदायक स्पंदनांपासून भूमीचे रक्षण होते. सूर्यास्तावेळी होळी पेटवली जात असल्याने आम्हीही तोपर्यंत जंगलात इतरत्र भ्रमण करुन यायचे म्हणून पुढे निघायचे ठरवले होते.

सूर्य डोंगरापल्याड जाता जाता मी बोरीत परतलो. सांजकिरणाच्या सोनपिवळया रंगात गावाचा परिसर न्हावून निघाला होता. घराघरातून आदिवासी स्त्री-पुरुष आपली पारंपारिक वेशभूषा गळयात चांदीची सळी, कर्णभूषणे, हातात पाटल्या, कमरेवर करगोटा, पायात तोडे इ. आभूषणं घालून, हातात पुजेचं साहित्य घेवून येवू लागले होते. मुलं-मुली नवीन कपडे घालून होळीच्या परिसरात नाचगाणे करत होते. एवढयात गावातून गावकरी गावपाटलाला वाजत-गाजत घेवून येत होते. तोपर्यंत गावातील इतर मंडळीही होळीजवळ जमली होती. पाटील येताच गावकऱ्यांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. पाटील दाम्त्याने होळीची पूजाअर्चा केली. होळीला अग्नी दिला. इतरही पूजा करु लागले. होळीला नैवद्य अर्पण करु लागले. तोपर्यंत हळूहळू दोन्ही होळींनी पेट धरला. ज्वालां उडू लागल्या. सांजवेळीनंतरच्या त्या तांबडया ज्वाळांच्या प्रकाशात आदिवासींचे होलीपूजन प्रकाशमय होवू लागलं होतं. त्यांची वेशभूषा, वागणूक या तांबडया प्रकाशात झळकत होती. काही मंडळी ढोल-टिमकी-बासरीच्या नादात नृत्य करत होते. एवढयात होळीत असलेला उंच बांबू अर्धवट जळून खाली पडतांना दिसला. आदिवासी तरुणांचा एक जथ्था बांबू पडण्याच्या दिशेने आला. त्यांनी तो हातावर अडविला. तुकडे करुन परत अग्नीत टाकले. ही बाब शुभ समजली जाते. काही वेळातच

होळीच्या उत्साहाला उधाण आलं होतं. स्त्री-पुरुष गोल वर्तूळ करुन नाचू लागले होते. त्यांच्या मुखातून शब्द फुटू लागले होते –

मोई रे मांजा, होली का दंडा जलो गयो क्या

मोई रे मांजा, होली का दंडा जलो गयो क्या …..

बाजूला काही आदिवासी स्त्री-पुरुष लाकडाच्या प्रतिकात्मक वस्तूची पूजा करत होते. मागील वर्षी होळीत एक गावकरी जळून मृत्यू पावला होता. त्या पुरुषाच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून या पूजेचे औचित्य असल्याचे कळले.

मध्यरात्रीपर्यंत मेळघाटी होळीचा आनंद मीही तेथे राहून घेतला होता. हळूहळू होळीचा ज्वर ओसरत चालला होता. गर्दी पांगू लागली होती. पोर्णिमेचा चंद्र शिरावर असतांना माझी पावलंही हरिसाल मुक्कामी परतली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी “मेघनाथ पूजा” पाहाण्यासाठी जायचे असल्याने आम्हीही झोपी गेलो.

पूर्वेचं मेळघाटी तांबडं फुटलं होतं. पाखरांच्या मंजूळ स्वरातच पहाट उगवली. पाखरांसोबत गावकरीही जागे झाले. मीही तयार होवून पुढे निघालो. हरिसालच्या पश्चिमेकडे सात-आठ किलोमिटरनंतर “कारा” हे गाव. गावाच्या पलीकडच्या काठावर सर्वत्र पाला पडल्या होत्या. त्यात दुकाने थाटली होती. कपडे,दागिने, अन्नधान्य, किरणा,

भाजीपाला इ.च्या दुकानासमोर आदिवासी स्त्री-पुरुष, तरुण-तरुणींची गर्दी होवू लागली होती. मेळघाटातील मेघनाथ जत्रेतील उत्साहाचा ज्वर चढू लागला होता. मीही या आनंदात सामील झालो होतो. कोरकू आदिवासी स्वत:ला रावणवंशी मानतात. रावणाचा मुलगा “मेघनाथ” हा सर्व देवतांना जींकणारा महापराक्रमी देव असं "कोरकू" मानतात आणि म्हणूनच होळीच्या दुसऱ्या दिवशी लाकडी खांबाची म्हणजेच पर्यायानं मेघनाथाची पूजा करतात. एका उंच खांबावर लाकडी फळी आडवी बसवितात. त्याला एक कापड बांधतात. लाकडी फळीच्या खाली “मचाण” तयार करतात. या खांबावर चढायला लाकडी शिडी असते. फळीच्या दोन्ही बाजूला दोरखंड बांधतात. गावचा परिहार म्हणजेच भगत अंगात आल्यावर या खांबावर बसतो. जोरजोराने ओरडून मेघनाथला आळवतो. त्याचवेळी दोरखंड ओढून फळी गोल फिरवतात. हळूहळू मेघनाथाजवळ गर्दी होवू लागली होती.

मेघनाथाची पूजा सुरु झाली होती. जवळ तीन “भगत”(यालाच “भूमका” असे म्हणतात.) बसले होते. त्यांचेसमोर अज्ञान आणि अंधश्रध्देच्या चक्रव्यूहात अडकलेले आदिवासी स्त्री-पुरुष ताटात पूजेचं साहित्य आणि एका हाती नवसाचा जीवंत कोंबडं घेवून उभे होते. भगताची पूजाअर्चा सुरु झाली. हळद-कुंकू, उदबत्या पेटू लागल्या. ऐकेका कुटूंबाची पूजा संपल्यावर भगत हातात कोंबडा व कु-हाड घेवून लाकडी ओंडक्यावर कोंबडयाचा बळी देत होता. देवावर कोंबडयाच्या रक्ताचा अभिषेक करायचा. तीनही भगतांपुढे नवस फेडणाऱ्यांची गर्दी होवू लागली होती. कोंबडे फडफडू लागले होते. कुटूंबावर अनिष्ट ओढू नये म्हणून आदिवासी हा नवस फेडतात. होळीच्या तिसऱ्या दिवसाची ही

“मेघनाथ पूजा” सोबत यात्रा आणि बाजार एक वेगळाच अनुभव मिळाला होता. ही जत्रा म्हणजेच कोरकूंना एक पर्वणीच असते. करमणूकीच्या नवनवीन प्रकाराचा ते आनंद लुटत असतात.

देशाला स्वातंत्र्य मिळून सदुसष्ट वर्षे लोटली. विविध सरकारकडून आदिवासींच्या विकासासाठी विविध योजना राबविल्या जात आहेत. करोडो रुपये खर्च होत आहे. परंतु अज्ञान, अंधश्रध्दा याच्या चक्रव्यूहातून आदिवासी समाज काही पूर्णपणे बाहेर पडला नाही. भगत-भूमका या संधीसाधूंनी त्याला जोखडून ठेवलं. ही परिस्थिती बदलायला आणखी किती कालावधी लागणार?

“फगवा” हा होली उत्सवातील एक महत्वाचा भाग. मेळघाटात पाच दिवसाच्या होळी उत्सवात आदिवासींच्या परंपरेचे अनेक रंग पाहायला मिळतात. आदिवासी पळसफुलांपासून रंग तयार करतात. गावागावात उत्साहात धुलीवंदन सुरु असतांना रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांची वाट अडविल्या जाते. रस्त्याच्या मधोमध लाकडाचे ओंडके टाकून किंवा दोर धरुन स्त्रीया फेर धरुन “फगवा” मागतात. कोरकू गितं गातात –

हमरा फगवा देतो दे … हमरा फगवा देतो दे,

गाना दे रे, गाना दे रे… हमरा फगवा देतो दे…

नृत्याचा फेर धरतात. याला "होरयार नृत्य" म्हणतात. पैशाच्या रुपात फगवा मिळाला की, ओंडके बाजूला सारल्या जाते आणि येणाऱ्या जाणाऱ्याची वाट मोकळी करुन दिल्या जाते.

होळीला महाराष्ट्रात "शिमगा", दक्षिणेत "कामदहन" तर बंगालमध्ये "दौलायात्रा" असे म्हणतात. शिशिरातील फाल्गून पोर्णिमेच्या दिवशी होळी पेटविल्या जाते. होळी म्हणजे गारठवून टाकणाऱ्या थंडीला निरोप. थंडीच्या दिवसात आपल्याला उष्णता देणाऱ्या अग्नीला कृतज्ञतापूर्वक दिलेला निरोप.




म्हणजेच ऋतूराज वसंताचे स्वागत. देशात फाल्गुनी पोर्णिमेपासून पंचमीपर्यंतचे पाच दिवस, तर कुठे दोन दिवस तर कुठे पाचही दिवस हा उत्सव साजरा केला जातो. मेळघाटात पाचही दिवस हा उत्सव मोठया उत्साहाने साजरा करतात.

“होळी” हा विकारांची होळी करण्याचा सण आहे. “विकारांची जळमटे जाळून टाकून नवीन उत्साहाने सत्वगुणाकडे जाण्यासाठी आम्ही सिध्द आहोत”, याचे जणू हा सण प्रतीकच आहे. राहिलेला सूक्ष्म-अहंकार हाही होळीतील अग्नीत नाहीसा होतो. तो शुध्द सात्विक होतो. त्यानंतर रंगपंचमी आनंदाची उधळण करत येते. नाचत-गात एकत्र येवून जीवनाचा आनंद लुटायचा. म्हणजेच आनंदाची उधळण करणारा हा उत्सव आहे.

होळीत वापरण्यात येणाऱ्या लाकडांमुळे कित्येक वृक्ष नष्ट केले जातात. यामुळे वनाची हानी होते. आदिवासी हा जरी निसर्गपूजक आणि निसर्गरक्षक असला तरी डोंगरकपारीतील गावागावात अशा कित्येक होळयांसाठी किती वृक्ष तोडली जात असतील आणि त्यामुळे एकप्रकारे वनाचा काही प्रमाणात –हास होतोच ना ? पर्यावरणाचं संतुलन बिघडतचं ना ? याला जबाबदार कोण ? परंतु आदिवासी हे जंगलाचे खरे रक्षक आहेत. त्यामुळे या जंगलावर त्याचा थोडाफार हक्क चालू शकतो, असं म्हटल्यास वावगं होणार नाही.

अशा तऱ्हेने सातपुडयाच्या दऱ्याखोऱ्यातील आदिवासी कोरकू आपल्या परंपरागत पध्दतीने होळीचा हा सण साजरा करतात. पंचमीच्या दिवशी होलिकोत्सवाची सांगता होते. त्या दिवशी मोहाच्या फुलांपासून तयार केलेली “सिडडू” (एक प्रकारचं मद्य) प्राशन करणं पवित्र समजलं जाते. सर्व सुखदु:ख विसरुन त्यात ते तल्लीन होतात. सातपुडयातील होळीच्या रंगाचा हा अनोखा सण कोरकूंच्या आयुष्यातही आनंदाचे रंग भरत असतो. दऱ्याखोऱ्यांचा, घनदाट वनश्रीचा आणि समृध्द सजीवसृष्टीचा मेळघाट या होळीरंगात न्हाउन निघत असतो.



दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्या-आमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्च्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com

9987737237

www.esahity.com